# गांधी कथा

(मराठी)

उमाशंकर जोशी



नवजीवन

# गांधी कथा

(मराठी)

**उमाशंकर जोशी**

अनुवादक

**युवराज मोहिते**

पहिली आवृत्ति, जुलै २०१०

ISBN: 978-81-7229-417-5

मुद्रक व प्रकाशक

विवेक जितेंद्र देसाई

**नवजीवन मुद्रणालय**, अहमदाबाद-३८० ०१४

फोन ; ०७९ - २७५४०६३५, २७०४२६३४

E-mail : sales@navajivantrust.org

Website : www.navajivantrust.org

# कर्पूर दिवा

महात्मा गांधीजी बंगालमध्ये असताना त्यांच्याकडे एकाने संदेश मागितला. गांधीजींनी बंगाली भाषेतच उत्स्फूर्तपणे सांगितलं – ‘आमार जीवन इ आमार वाणी...’ ‘माझं जीवन हाच माझा संदेश!’ या चार शब्दांतून गांधीजींना सुचवायचं होतं की, आपल्या कामातून, आचरणातूनच जीवनसंदेश प्रकट व्हायला हवा. आणि ते जगले ते तसचं. गांधीजींच्या आयुष्यात घडलेल्या अनेक घटनांतून त्यांच्या महान व्यक्तिमत्त्वाची प्रचिती येते. त्यातून एक आगळीच अनुभूती प्रत्ययाला येते. या महान विभूतीच्या जीवनातील १२५ कथांचा गुच्छ मांडण्याचा माझा प्रयत्न आहे. यापैकीच या काही कथा. गांधीजींच्या आयुष्यातील या एक-एक घटना म्हणजे अंधाराला छेदणारा कापराचा दिवाच. यातून नव्या पिढीला नवा प्रकाश मिळावा हाच हेतू...

निर्भयता, सत्यप्रियता, अहिंसा या प्रत्येक मूल्याशी निगडीत प्रसंग वेगवेगळे करून ते एकत्रही मांडता आले असते. पण निर्भयता आणि अहिंसा या दोहोंचा मेळ असलेले काही प्रसंग आहेत. त्यामुळे सगळ्या घटना एकत्रच गुंफलेल्या आहेत. काळानुरूप सगळ्या प्रसंगाची एकामागे एक अशी मांडणीही करता आली असती. पण मग अमुक एका वर्षातला प्रसंग का नाही, असा प्रश्न मनात आला असता.मुळात गांधीजींचं समग्र जीवन तारीखवार मांडण्याचा हा मुद्दाच नाही.१९६९ साली गांधीजींच्या जन्मशताब्दी वर्षात जानेवारी ते ऑक्टोबर या दरम्यान 'संस्कृती'मध्ये जे लिखाण केलं त्याच 'गांधीकथां' इथे संकलीत केल्या आहेत.

गांधीजी कोणत्याही घटनेच्या सत्यतेबाबत आग्रही असायचे. त्यांच्या जीवनातील या घटनांच्या सत्यतेबाबतही योग्य ती काळजी घेतली गेली आहे.

या घटनांच्या संदर्भात मी बापुजींनी स्वत: केलेल्या लिखाणाचा उपयोग केला आहे. त्याशिवाय 'महादेवभाईनी डायरी' (खंड १ ते ८), रावजीभाई पटेल यांची पुस्तकं, श्री काकासाहेब कालेलकर, मनुबेन गांधींची पुस्तकं, प्रभुदास गांधीकृत ‘जीवननी परोढ’, रामदास गांधी यांचं ‘संस्मरण’, तसंच शंकरलाल बँकर यांचं ‘गांधीजी आणि राष्ट्रीय प्रवृत्ती’ या सगळ्यांचा संदर्भ या कथांना आहे. या सगळ्या लेखकांचा मी ऋणी आहे. या सोबतच गांधीजींच्या पुस्तकाचे प्रकाशक

– नवजीवन प्रकाशन मंदिर तसंच महादेवभाई आणि मनुबेनच्या अनेक पुस्तकांचे अन्य प्रकाशक यांचे मी आभार मानीत आहे. अनेक व्यक्तींकडूनही मला काही घटनांची माहिती मिळालेली आहे. त्यात विजयाबेन पंचोली, प्रभावतीबेन नारायण तसंच मदालसामॅडम नारायण अशा सगळ्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

- उमाशंकर जोशी

कुलगुरूनिवास,

गुजरात युनिव्हर्सिटी,

अहमदाबाद ३८०००९

गांधी जन्मशताब्दीदिन, २-१०-१९६८

# प्रकाशकाचे निवेदन

गांधी जन्मशताब्दी वर्षात स्वर्गीय श्री उमाशंकर जोशींनी 'संस्कृति' या आपल्या पत्रिकेत जानेवारी ते ऑक्टोबरपर्यंत गांधीजींच्या जीवनातील १२५ प्रसंग प्रकाशित केले. या प्रसंगांना जेव्हा 'गांधी कथा' नामक पुस्तकरूपात प्रकाशित करण्यात आले, तेव्हा जोशीजींनी 'कर्पूर दिव्यां'च्या रुपात त्यांची ओळख करून दिली.

मध्यंतरी हे पुस्तक अप्राप्य होते. 'गांधी जीवन दर्शन परीक्षे'साठी हे पुस्तक उपलब्ध करण्याची इच्छा गांधी-स्मृतीचे परीक्षा संयोजक श्री अंधारियांनी व्यक्त केली. लेखकाची परवानगी मिळाल्यास आम्ही हे पुस्तक जरूर प्रकाशित करू, असे 'नवजीवन'ने त्यांना सूचित केले. त्यांनी श्रीमती स्वातिबेन उमाशंकर जोशींकडून परवानगी मिळवून प्रकाशनाचा मार्ग मोकळा केला.

ही आवृत्ती त्या १२५ कर्पूर दिव्यांची 'गांधी कथा' नाही. श्री अंधारियाजींनी परीक्षेच्या दृष्टीने केवळ ६० प्रसंग निवडले. अशा प्रकारे परीक्षार्थ्यांसाठी तयार केलेली ही 'गांधी कथे'ची खास आवृत्ती आहे. श्रीमती स्वातिबेननी या प्रसंगांना या प्रकारे प्रकाशित करण्यास परवानगी दिली, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. 'गांधी कथे'ची ही आवृत्ती सर्वसामान्य वाचकांसाठीही आनंददायी ठरेल, अशी आशा बाळगतो.

## (१)

लहानगा मोहन अंधारात जायला घाबरत असे. अंधार पाहिला की त्याचं काळीज धडधडायचं. अंधारात एका बाजूने भूत येतं तर दुसऱ्या बाजूने प्रेत येवून आपल्याला धरतं, असं त्याच्या मनाने घेरलं होतं. या भीतीपोटीच अंधारात जायला तो धजत नसे. अशा मोहनला एकदा अंधाराचा सामना करावा लागला आणि बिकट प्रसंग उद्भवला. त्याचं असं झालं -

रात्रीची वेळ. मोहनला घराकडे जायचं होतं, पण घराजवळ अंधार होता. त्यात जायचं कसं? मोहनची घाबरगुंडी उडाली. त्या अंधारात पाऊल टाकायचं तरी कसं, असा यक्ष प्रश्न त्याला पडला होता. त्याची त्रेधा उडाली होती. त्याची ही तगमग शेजारच्या घरातून रंभामावशी (सुईण) पाहात होती. ती मोहनच्या जवळ आली. त्याच्या पाठीवर हात ठेवून हलकेच म्हणाली, ‘घाबरतोस कशाला? अंधार असला तर असू देत बापडा. अरे 'रामनाम' जपत अंधारात जा. आपल्या केसालाही धक्का लागत नाही.

तिच्या त्या समजावणीने मोहनला धीर आला. रामनाम घेत मोहनने पाऊल गुढे टाकलं... आता त्याच्या मुखातच नव्हे तर रोमारोमांत राम नाम संचारलं होतं. त्या घटनेने मोहन निर्भय झाला.

तो सगळ्यांना सांगू लागला, ज्याला रामाची साथ त्याला भीती कशाची ?

रामनामाच्या उच्चाराने मोहन एवढा निर्भय झाला की पुढे त्याने चाळीस कोटी भारतीयांना – एकूण मानवमात्राला निर्भयतेचा संदेश दिला. यातूनच पुढे क्रांती घडली.

आणि जीवनाच्या शेवटच्या क्षणीदेखील त्यांच्या जिभेवर तोच शब्द होता-'राम' !

## (२)

सेवाग्राम आश्रम नुकताच सुरु झाला होता. आश्रमात कापूस पिंजणे, सूतकताई यासारख्या कामाचं प्रशिक्षण घेण्यासाठी आजुबाजूच्या गावातील लहान मुलं यायची. संध्याकाळी घरी जाताना त्यांच्या हातावर दोन पैसेही मिळायचे. ही मुलं सकाळी यायची नी संध्याकाळी परतायची. एकदा रात्री झोपायला जाण्याआधी बापूंना या मुलांची आठवण झाली. आश्रमात बापूंना सहाय्य करणाऱ्या विजयाला त्यांनी विचारलं की, या मुलांच्या दुपारच्या जेवणाची काय व्यवस्था असते ?

विजयाला या मुलांची माहिती होती. बापू, बा आणि स्वतःचे कपडे धुण्यासाठी विजया रोज दुपारी विहिरीवर जायची. त्याचवेळी आश्रमात येणारी ही मुलं विहिरीजवळच्या बांधावर जेवायला बसायची. ती काय खातात, हे  विजयाला त्यामुळे कळत होतं. आज डब्यात काय आणलें, असें ती अनेकदा या मुलांना विचारायची. मग ती मुलं नेहमीप्रमाणे सांगायची, 'भाजी-भाकरी'...

हे सगळं विजयाने बापूंना सांगितलं. ते ऐकल्यावर बापूंनी विचारलं : आपल्याकडे रोज जे ताक असतं त्यातून काही उरतं का?

विजयाने होकारार्थी मान हलवली.

‘मग उद्यापासून दुपारी या मुलांना ताक द्या', बापूंनी सांगितलं.

‘होय', म्हणत विजयाने मान डोलावली.

तीन दिवसांनी बापूंना झोपायला जाताना त्या मुलांची एकदम आठवण झाली. त्यांनी विजयाला विचारलं, ‘त्या मुलांना आपण ताक देतोय ना ?'

विजया अडचणीत सापडली. आपली चूक कबूल करत ती म्हणाली, “बापू मी तर ते विसरलेच. माझ्याकडून मोठी चूक झाली.

हे ऐकून बापूंच्या चेहऱ्यावर भाव बदलले. मात्र काही क्षणांनी शांत स्वरात ते विजयाला म्हणाले, 'नाही तू विसरली नाहीस. असा विसरण्याचा तुझा स्वभाव नाही. माझी जी कामं तू शिरावर घेतेस, ती तू नीट लक्ष देवून पूर्ण करतेस. मी फिरायला निघतो तेव्हा माझ्या चपला व्यवस्थित साफ करून जागच्या जागी असतात, त्याजवळ माझी काठी नीट ठेवलेली असते. त्यामुळे तू काही विसरभोळी नाहीस. पण एक सांगू? तू माझी सगळी कामं नीट आणि व्यवस्थित का करतेस माहीत आहे? कारण मला 'महात्मा' म्हणतात. अशा माणसाचं काम न विसरता नीटच व्हायला हवंय ना? पण ती तर लहान, अज्ञानी पोरं आहेत, म्हणूनच त्यांच्याबाबतच्या कामाचा तुला विसर पडतो. पण मी तुला सांगतो. एक वेळ माझं काम राहिलं तरी चालेल, पण या लहानग्यांचा विसर पडू देवू नकोस. त्यांची नीट काळजी घे, मला त्यातून अधिक समाधान मिळेल...

विजयासाठी तो एक मोठा धडा होता.

## (३)

सेवाग्राम आश्रमात एक अनाहुत मुलगा इकडे-तिकडे फिरत होता. विजयाच्या ते लक्षात आलं. तिने त्याला त्याचं नाव आणि काम विचारलं.

'माझं नाव सोमा. साबरमती आश्रमात मी आधी राहिलेलो आहे. आता मला या आश्रमात रहायचं आहे'. त्याने विजयाला सांगितलं.

विजया त्याला घेवून बापूंकडे गेली. बापूंनी त्याला ओळखलं. सोमा हा दलित समाजातील होता. 'सोमाला इथेच राहू दे,' असं म्हणत बापूंनी विजयाला काही सूचना केल्या.

सोमा साबरमती आश्रमात रूळला. तो तिथल्या वस्तू हाताळायचा. त्यांची नीट निगा राखायचा.

सोमा फैजपूरच्या अधिवेशनातून मजल दरमजल करीत रिकाम्या हातीच येथे पोहोचला होता. अगदी चड्डी-बनियानवरच तो होता. तिथे विजयाने त्याच्या जेवणाची व्यवस्था केली. तिने त्याला झोपायला तिच्याजवळची एक सतरंजी दिली. कस्तुरबांनी त्याला पांघरूण दिलं.

तो रविवार होता. नेहमीप्रमाणे रात्री बापूंचं मौनव्रत सुरू झालं. ते सोमवारी रात्रीपर्यंत चालायचं. रात्री झोपायला जाताना बापूंना सोमाची आठवण झाली. चालता चालता त्यांनी जमिनीपासून दोन-तीन फूट हात वर धरून इशारा करून त्या लहान मुलाचं काय झालं ? असं खुणेनेच विचारलं. त्याची नीट व्यवस्था झाली आहे, असें विजयाने दोन्ही हाताने इशारा करून ठामपणे सांगितलें. विजयाने कितीही सांगितलं तरी बापूंचा विश्वास बसेल तर ना ? हातानेच त्यांनी 'चल' असा इशारा करून, ते त्या मुलाच्या दिशेने निघाले. बापूंनी पाहिलं की अंगावर पांघरुण ओढून तो झोपला होता.

बापूंनी मग विजयाला हाताने इशारा करत आतल्या खोलीत नेलं. तिथे एका खुंटीवर एक गाठोडं ठेवलेलं होतं. ते तिला खाली काढायचा इशारा केला. मग खाली बसून त्यांनी ते गाठोडं सोडलं. त्यात त्यांची जुनी धोतरं नीट घड्या घालून एकावर एक ठेवली होती. त्यातील दोन घड्या

हातात घेवून बापू उठले. पुन्हा ते सोमोजवळ आले. त्याच्या अंगावरचं पांघरूण त्यांनी थोडं खाली खेचलं. तो झोपेतच होता. बापूंनी त्याचं डोकं हलकेच हातावर उचललं. त्याच्या डोक्याखाली नरम कपड्यांच्या त्या घड्या ठेवल्या. त्याचं पांघरूण नीट केलं. मग ते झोपायला गेले.

सोमाला गाढ झोप लागली होती. एका महात्म्याने काळजीपूर्वक वात्सल्याची उशी त्याच्या डोक्याशी ठेवली होती...

## (४)

१९२२ साली इंग्रज सरकारने बापूंना सहा वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावली. या खटल्यात त्यांनी भर कोर्टात बजावून सांगितलं की, सरकारच्या दृष्टीने जो गुन्हा ठरतोय तो मात्र मानवतेच्या दृष्टीने धर्म आहे. मी माझं कर्तव्य बजावलंय. आता यासाठी जी काय सजा करायची ती करा... इंग्रज सरकारने त्यांना जेलमध्ये टाकलं

या शिक्षेची बातमी देशभर वाऱ्यासारखी पसरली. गावागावांत यामुळे चिंतेचं वातावरण पसरलं. वर्तमानपत्रांतून या शिक्षेच्या बातम्या वाचून लोक हादरले. बंगालमधील दूरच्या गावातील एक मुस्लिम गृहस्थ ते वाचून ओक्साबोक्शी रडू लागला. त्याच्या शेजारी सशस्त्र क्रांतीचा समर्थक असलेला श्री. दत्त रहात होता. दत्तने त्याला विचारलं, 'बंधू, का रडताय ?'

हातात असलेला बंगाली पेपर त्याने दत्तला दाखवला. त्यात गांधीजींच्या खटल्याची तसंच शिक्षेची सविस्तर माहिती होती.

‘माझ्या जातीच्या एका माणसाला सहा वर्षांची शिक्षा झालीय. म्हातारा आहे तो, ५३ वर्षांचा. बघ हे काय छापलंय ते"... तो पुन्हा रडू लागला...

या खटल्या दरम्यान गांधीजींनी आपला व्यवसाय शेती आणि विणकाम असल्याचं नमूद केलं होतं. ही सगळी माहिती त्या बातमीत दिली गेली होती. तो मुस्लिमही विणकर जातीचा होता. त्यामुळे गांधी आपल्याच जातीचे असून त्यांना शिक्षा झाल्याचं अतीव दु:ख त्याला झालं होतं.

हा किस्सा लिहिताना दत्त यांनी नमूद केलंय की, आम्ही कसले क्रांतीकारी ? खरे क्रांतीकारक तर गांधीजी आहेत. सगळ्या देशाशी ते एकरूप झाले आहेत. मी शेतकरी आहे, मी विणकर आहे, असं सांगत भारताच्या वेगवेगळ्या भागातील मातीच्या माणसाशी आपली नाळ जोडून ते लोकांच्या हृदयात पोहोचले. त्यामुळे आपला माणूस आपल्यासाठीच जेलमध्ये गेलाय, असं कोट्यावधी जनतेला वाटतं. जनतेशी असा एकरूप झालेला माणूसच देशाला स्वातंत्र्य मिळवून देवू शकतो. अशा क्रांतीकारकाला सलाम...

## (५)

बापू केवळ पंचा नेसत होते. त्यांना एका विद्यार्थ्याने विचारलें 'बापू तुम्ही पूर्ण कपडे घालून शरीर झाकत का नाही ?'

बापू म्हणाले, 'अरे त्यासाठी माझ्यापाशी पैसेच नाहीत.'

विद्यार्थी : मी माझ्या आईला सांगतो. ती तुम्हाला घालायला डगला शिवून

देईल. मग घालाल ना?

बापू : असे किती डगले शिवून देशील ?

विद्यार्थी : तुम्हाला किती हवेत ? एक... दोन... तीन...

बापू : मी काही एकटा नाही. मी एकट्यानेच कपडे कसे घालू?

विद्यार्थी : किती लोकांसाठी हवेत ? पाहिजे तेवढे देतो.

बापू : माझे ४० कोटी भाऊबंद आहेत. तुझी आई या सगळ्यांना कपडे शिवून देईल ? या सगळ्यांना मिळाल्यानंतर मग मला कपडे घालता येतील.

विद्यार्थी विचारात पडला. तो बिचारा प्रेमाने बापूंना कपडे द्यायला निघाला होता. मात्र बापूंनी त्याला वसुधैवंकुटुंबकमची दीक्षा दिली. त्याच्या हृदयात ही घटना कायम राहिली.

## (६)

दिवसभर प्रचंड कामाचा डोंगर उरकत असतानाही बापू रोज सकाळी एक तास न चुकता फिरायला जात. त्यांचे राजकीय गुरू गोपाळकृष्ण गोखले यांची प्रकृती अधेमध्ये ठीक नसायची. ते बापूंसारखे सकाळी फिरायला जात नसत. यामुळे बापू आदराने त्यांच्याकडे नाराजी व्यक्त करत असत.

बापू आश्रमातून फिरायला निघायचे तेव्हा त्यांच्यासोबत अनेक लोक असत. कुणाला त्यांच्याशी खास काही बोलायचं असेल, तर ते सकाळी फिरायला जातानाचा वेळ त्यांना देत. चालता चालता ते चर्चा करत असत.

पण यात बापूंवर पहिला अधिकार असायचा तो लहान मुलांचा. त्यांना प्राधान्याने वेळ मिळायचा. बापूही त्यांच्यासोबत खेळताना रमायचे, दंगामस्ती करायचे.

एकदा एक चतुर मुलगा बापूंना म्हणाला, 'बापू तुम्हाला एक गोष्ट विचारू का ?'

बापूंनी 'हो' म्हणताच तो बापूंच्या जवळ गेला आणि म्हणाला, 'दुसऱ्याला दु:ख देवू नये म्हणजेच अहिंसा आहे ना?'

मुलाने अत्यंत हुशारीने प्रश्न विचारला होता.

‘अगदी बरोबर’ ... त्याच्या प्रश्नावर बापू म्हणाले.

तीच संधी साधत पुलाने पुढे विचारलं, ‘मग हसत हसत आमचा गाल धरत तुम्ही चिमटा काढता ती हिंसा की अहिंसा ?'

मुलाचा डाव लक्षात येताच बापू म्हणाले, 'थांब लबाडा, आता दाखवतोच तुला.’ त्याला पकडून बापूंनी त्याच्या गालाला प्रेमाने चिमटा काढला.

ते पाहून सगळी मुलं हसू लागली. टाळ्या वाजवत ती ओरडत होती, 'बापू चिडले, बापू चिडले...’

या सगळ्यात बापूंनाही त्यांचं हसू आवरत नव्हतं.

## (७)

एका बड्या असामीकडे गांधीजी मुक्कामाला होते. संध्याकाळी प्रार्थनेची वेळ होती. अनेक लोक प्रार्थनेसाठी हॉलमध्ये जमले होते. प्रार्थना सुरू होण्याआधी बापू म्हणाले, 'इथले सगळे दिवे बंद करा.' घराचा मालक जिथे बसला होता त्याच्या डोक्यावरच विजेचं बटण होतं. पण त्याने नेहमीच्या सवयीने ते बंद करायला आपल्या नोकराला हाक मारली.

मात्र अचानक गांधीजी उठले. त्यांनी तडक पुढे चालत जात स्वत:च दिवे बंद केले. सारेच सुन्न होवून ते पाहात राहिले. प्रार्थना सुरू झाली. त्यानंतर रोजच्याप्रमाणे प्रश्नोत्तरं झाली. कताईकामाविषयी कुणाची काही शंका होती, त्यावर उत्तर देताना बापूंनी गीतेचा दाखला देत सांगितलं की, 'जे साधी-साधी कामंही (यज्ञार्थ कर्म) करत नाहीत ते चोर आहेत.

प्रार्थनेनंतर लोक पांगू लागले. त्या गर्दीत तिथल्या टेबलाला कुणाचा तरी धक्का लागला आणि टेबलावरील काचेची सुशोभित भांडी खाली पडली. त्यांचे तुकडे तुकडे झाले.

ते पाहाताच मालक तडक तिथे धावले. मात्र आता त्यांनी नोकराला न बोलावता सगळे तुकडे ते स्वत:च गोळा करू लागले. त्यांच्यात एवढं लगेच परिवर्तन कसं झालं ?

घरात आलेल्या महान अतिथीच्या सहवासाची ही किमया होती...

## (८)

शाळा सुटली की लहान मोहन थेट घरी निघून यायचा. आजूबाजूलाही तो कधी पाहत नसे. माझी कुणी खोड काढून मला चिडवलं मग? अशी त्याला भीती वाटायची. शाळा उघडली की तो शाळेत जायचा आणि शाळा सुटली की आधी घर गाठायचा. हा त्याचा नित्याचा क्रम. अतिशय लाजाळू स्वभाव. त्यामुळे जेवढ्यास तेवढं काम. त्याला ना कोणी मित्र ना कोणी गप्पा मारायला सवंगडी.

शाळेतही त्याची वर्तणूक अतिशय साधी. शिक्षकांबद्दल नितांत आदरभाव. त्यामुळे इतर मुलांप्रमाणे शिक्षणात मस्करी वा खोटं काम करण्याचा प्रश्नच नाही.

एकदा शाळेची तपासणी सुरू होती. शिक्षण निरीक्षक जाईल्स हे शाळेत आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना पाच इंग्रजी शब्द लिहायला सांगितले. मोहनने 'केटल' या शब्दाचं स्पेलिंग चुकीचं लिहिलं. त्याच्या शिक्षकांनी त्याला पायाने ढोसत ते चुकीचं असल्याचं सांगण्याचा प्रयत्न केला. पण तो इशारा मोहन मानेल तर ना? इतर विद्यार्थ्यांच्या मागे उभं राहून शिक्षक गपचूप स्पेलिंग नीट करून घेत होते. शिक्षक-विद्यार्थ्यांनी मिळून अशी फसगत करणं मोहनला पटत नव्हतं. शेवटी सर्व मुलांच्या पाचही शब्दांचं स्पेलिंग अगदी बरोबर आलं. अपवाद फक्त आपल्या मोहनभाईंचा. त्याचंच स्पेलिंग चुकलं.

नंतर शिक्षकांनी मोहनचा कसा मूर्खपणा झाला ते त्याला सांगितलं. पण मोहनचं म्हणणं होतं की, माझ्या मनावर या खोट्या गोष्टीचा काहीही परिणाम झाला नाही. मला इतर मुलांसारखं अशा पध्दतीने फसवाफसवी करणं अजिबात जमणार नाही... सत्याचा आग्रह शाळेतूनच सुरू झाला होता.

## (९)

प्रवासात असतानाच गांधीजी एका आश्रमशाळेत भेट द्यायला गेले. पाऊस पडत होता. त्यामुळे तिथे मुलांना यायला उशीर झाला. गांधीजींना तिथून दुसरीकडे जायचं असल्याने त्यांच्याकडे वेळ कमी होता. त्यामुळे थोडाच वेळ ते मुलांना भेटले.

मुलांशी संवाद साधताना ते म्हणाले, ‘तुम्ही सगळे सूतकताई करता आणि खादीचे कपडे घालता. पण मला सांगा तुमच्यापैकी किती लोक नेहमी खरं बोलतात? म्हणजे कधीच खोटं बोलत नाहीत ?'

काही मुलांनी आपले हात वर केले.

गांधीजींनी पुढे म्हणाले, ‘ठीक आहे. आता कधीमधी खोटं बोलतात अशांनी हात वर करा.’

दोन मुलांनी हात वर केला... मग तिघांनी... चौघांनी, त्यानंतर अनेक हात वर झाले. जवळपास साऱ्यांनीच हात वर केले.

गांधीजींनी साऱ्यांकडे पाहिलं आणि म्हणाले, 'आपण कधी खोटं बोलतो याची जाणीव ज्यांना आहे, जे ते कबूल करतात त्या मुलांकडूनच मला मोठी आशा आहे. पण ज्यांना असं वाटतं की आपण कधीच खोटं बोलत नाही, त्यांचा भविष्यकाळ मात्र कठीण आहे. पण मी या दोन्ही प्रकारातील सगळ्यांचे सुयश चिंतीतो.

या मुलांना महत्त्वाचा धडा देत गांधीजींनी त्यांचा निरोप घेतला.

## (१०)

गांधीजींची सही मिळवण्यासाठी एकाने डायरी त्यांच्यापुढे धरली. डायरीची पानं फडफडत होती. त्या डायरीत जगभरातील महान क्रिकेटर्सच्या सह्या एकामागे एक रांगेत होत्या. त्या सह्यांच्या मालिकेत शेवटी गांधीजींनी सही केली. पण गांधीजीही काही कमी खेळाडू नव्हते.

पतौडी इलाख्याचे नवाब (त्यावेळचे) हे देशातील महान खेळाडू. ते एकदा गांधीजींना भेटायला गेले होते. गांधीजींनी तेव्हा गमतीने सांगितलं की, आपण दोघे आमने-सामने क्रिकेट खेळूया. हे आव्हान दोघांनी स्वीकारलं.

'पण एक अट आहे', असं म्हणत पतौडी गांधीजींना म्हणाले, 'मॅच झाल्यानंतर मी राजकारणात आपल्याला आव्हान देईन, त्यासाठी तुम्ही परवानगी द्या.

गांधीजींनी ते कबूल केलं.

मग नवाब पतौडी गंभीर झाले आणि म्हणाले, 'बापू क्रिकेटमध्ये तुम्ही मला हरवणार, हे मी खात्रीपूर्वक सांगू शकतो. पण राजकारणात मात्र मी तुमचा सपशेल पराभव करीन, यात काही शंका नाही.'

हे ऐकून गांधीजी खळखळून हसू लागले. नवाबाला थोपटत ते म्हणाले, 'नवाबसाहेब, आपने तो मुझे अभीसे बोल्ड कर दिया.'

## (११)

राजकोटच्या अल्फ्रेड हायस्कूलचे मुख्याध्यापक जिमीसाहेब यांनी वरच्या वर्गातील मुलांसाठी खेळ आणि क्रीडाविषयक उपक्रम सुरु करून सगळ्यांना ते बंधनकारक केले. मोहनचा मात्र खेळांत विशेष सहभाग नसे. पण नंतर तो त्यात सहभागी झाला.

एक दिवस संध्याकाळी खेळात गैरहजर राहिल्याने मोहनला मुख्याध्यापकांनी बोलावलं आणि कारण विचारलं. मोहन म्हणाला, ‘मी इथे आलो होतो. पण त्यावेळी मैदानात कुणीच खेळत नव्हतं.'

‘किती वाजता आला होतास ?’ मुख्याध्यापकांचा प्रश्न.

‘माझ्याकडे त्यावेळी घड्याळ नव्हतं. आणि काहीसं वादळी वातावरण असल्याने नेमके किती वाजले होते याचा अंदाज आला नाही.’

मोहनचा खुलासा मुख्याध्यापकांना न पटल्याने तो बहाणा करतोय, खोटं बोलतोय, असं त्यांना वाटलं. त्यांनी मोहनला दोन आणे दंड केला. मात्र मोहनसाठी हा धक्का होता.

मला खोट ठरवलं गेलं, पण मी तसा नाही. मात्र मी खोटं बोललेलो नाही, हे कसं पटवून देवू ?... त्याच्या मनाची घालमेल उडाली. तो अस्वस्थ झाला. त्याला रडू येत होतं.

अनेक दिवस मोहन याच दुःखात होता. त्याने खूप विचार केला आणि अखेर मनात गाठ मारली. आपली बाजू सत्याची असावी, पण केवळ तेवढ्याने होत नाही. ते पटवून द्यावं लागतं. सत्याचं आचरण करताना त्याविषयी गाफील राहता कामा नये, हे त्याला उमगलं.

खेळाच्या मैदानातील त्या प्रसंगाने मोहनला हे मोठं सत्यवचन सापडलं. पुढे आयुष्यभर पाळलेल्या या वचनाचा प्रभाव सगळ्यांनाच दिसला.

## (१२)

गांधीजी पहाटे उठत. त्यानंतर दात घासून तोंड धुण्यासाठी पाण्याचा एक छोटा लोटा मोरीजवळ ठेवलेला असे. तेवढंच पाणी पुरे. काम झालं की तो लोटा तिथेच ठेवायचा हो पध्दत होती.

एकदा मोहनलाल पंड्यांनी त्यांना विचारलं, 'बापू तुम्ही या छोट्या लोट्यातून पाणी का घेता ? पाण्याचा तुटवडा आहे का? ही साबरमती तर वाहात चाललीय. मग पाण्याची काटकसर कशासाठी ?'

त्यांच्याकडे पाहात बापूंनी सवाल केला, 'आधी सांगा, माझं तोंड नीट स्वच्छ दिसतंय की नाही ?'

पंड्या म्हणाले, 'हो, तसं तर स्वच्छ आहेच.'

'मग अडचण काय आहे ?' गांधीजींनी प्रश्न केला. 'तुम्ही लोटे-लोटे पाणी वापरता, पण पसरलेल्या हाताने पाणी सांडत-सांडत तोंड धुता. मी पाणी न सांडता नीट तोंड धुतो. त्यामुळे लोटाभर पाणीही मला पुरतं.'

पंड्या : पण नदीचं पाणी तर एवढं वाहतयं...

गांधीजी : नदीचं हे पाणी कोणासाठी आहे ? माझ्या एकट्यासाठी ?

पंड्या : सगळ्यांसाठीच आहे, तुमच्यासाठीही आहे...

गांधीजी : बरोबर. नदीचं पाणी हे पशू-पक्षी, माणसं आणि सर्व जीवजंतूंसाठीही आहे. माझ्या एकट्यासाठी नाही. मला जेवढं हवंय तेवढंच मी त्यातलं घेतो. पण अधिक घेण्याचा माझा अधिकार नाही. नैसर्गिक साधनसंपत्तीतून आपल्याला जेवढं लागतं त्याहून अधिक का घ्यायचं ?

आता यापुढे पंड्या काय बोलणार ?

## (१३)

हातात मातीचं मोठं ढेकूळ घेवून येणाऱ्या एका सहकाऱ्याला पाहून गांधीजींनी विचारलं 'हे ढेकूळ कशासाठी आणलंस ?'

‘लोटा घासण्यासाठी...', तो सहकारी म्हणाला.

‘एवढं मोठं ढेकूळ ?'

'जे मोठं दिसलं ते उचलून आणलं.'

‘या अख्ख्या ढेकळाने लोटा घासणार ? उरलेल्या ढेकळाचं काय करणार ?'

‘ते उरलेलें राहील इथेच...’

‘ते त्याच्या जागीच राहायला हवंय, इथे ठेवलंस तर त्याचा कचरा होईल, ती तुझी पहिली चूक आणि आरोग्याविषयी काळजी करत नाहीस ही तुझी दुसरी चूक...’

गांधीजींच्या या वक्तव्याने तो सहकारी विचारात पडला. एवढा महान माणूस छोट्या छोट्या गोष्टींचा कसा विचार करतो, याचा प्रत्यय या सहकाऱ्याला आला.

गांधीजींनी मग त्याला कचरा म्हणजे काय? याची व्याख्या समजावली –‘सोन्याची लगडी तिजोरीऐवजी घराच्या कोनाड्यात पडली तर तो कचराच समजला जातो. एखादी वस्तू योग्य ठिकाणी नसणं म्हणजे त्याचा कचरा होणं...’

## (१४)

मोहन त्याच्या आईच्या सेवेसाठी सदैवं तत्पर. माता पुतळीबाई म्हणजे साध्वी स्त्री. पुजापाठ केल्याशिवाय ती जेवतही नसे. चातुर्मासात एकदाच अन्न ग्रहण करत असे. कठिणात कठीण व्रत ती लीलया पूर्ण करायची. प्रकृती बिघडली तरी व्रत सोडत नसे. दोन-तीन दिवस सलग उपवास म्हणजे तिच्यासाठी फार मोठी गोष्ट नव्हतीच. पराकोटीचा निग्रह. एका पावसाळ्यात पुतळीबाईंनी संकल्प केला की, सूर्यनारायणाचं दर्शन घेतल्याशिवाय मी अन्नग्रहण करणार नाही.

आपल्या आईचा हा संकल्प पाहून लहान मुलं चिंतेने विचारात पडली, कारण ते दिवस पावसाळी ढगाळ वातावरणाचे होते. मातेने लवकर जेवावं म्हणून सगळी मुलं बाहेर आकाशात सूर्याचा शोध घेवू लागली. क्षणात तो दर्शन द्यायचा आणि क्षणात ढगाआड गुडूप व्हायचा. सूर्य दिसला की छोटा मोहन आईपाशी धावत जायचा. 'बा, बा, मी सूर्य पाहिला... तो उतावीळ होत सांगायचा.'

आईसमवेत सगळे मग लगबगीने अंगणात यायचे. पण तोवर सूर्यराव दिसेनासे व्हायचे. मोहन आणि इतर मुलं हिरमुसायची. पण माता पुतळीबाई हसत-हसत त्यांची समजूत काढायची, ‘अरे काय झालं ? आज माझ्या नशिबात काही खायचं नाही असंच दिसतंय’... मात्र ती आपल्या संकल्पापासून जराही विचलीत न होता पुन्हा घरच्या कामात गढून जायची.

आपल्या मातेच्या तपस्वी जीवनप्रणालीचा प्रभाव मोहनच्या जीवनावर झाला. धर्म जीवनाचा मुख्यपाठ मोहनला त्याच्या आईकडून मिळाला. आचाराचं पालन आणि तपोजीवन याबाबत मोहनची आईच त्याचा गुरू होती.

## (१५)

दक्षिण आफ्रिकेत गांधीजींनी फिनिक्स आश्रमाची स्थापना करून तिथे लहान मुलांसाठी शाळाही सुरू केली. मुलांना जीवनात खरी शिकवण मिळावी, यासाठी गांधीजींचा प्रयास होता. ते मुलांच्या परीक्षाही घ्यायचे.

परीक्षेत गुण देण्याची बापूंची पध्दत आगळी होती. ते सर्व वर्गातील मुलांना एकाच पध्दतीचा प्रश्न विचारायचे. ज्या पध्दतीने मुलं त्याचं उत्तर देतील, त्याप्रमाणे ते त्याला मार्क द्यायचे. जो सगळ्यात चांगलं उत्तर लिहिल, त्याला कमी गुण, मात्र ज्याने फार चांगलं उत्तर लिहिलं नसेल त्याला अधिक गुण, अशी पध्दत त्याकाळी त्यांनी स्वत:च ठरवली होती.

या प्रकाराने मुलं विचारात पडली. आपण मागे रहाणार, असं काही मुलांना वाटू लागलं. पण बापूंनी परोपरीने सगळ्या मुलांना समजावलं.

‘यातील अमुकच विद्यार्थी हुशार, इतर नाहीत, असं ठरवण्यासाठी हा गुण देण्याचा माझा मानस नाही. पण तुमच्या वैयक्तिक आयुष्यात किती सुधारणा झाली ते मला पाहायचं आहे. जी हुशार मुलं आहेत ती इतरांशी तुलना करत राहिली, तर त्यांची हुशारी संपेल. त्यांनी आपल्या विकासासाठी, जीवनात पुढे जाण्यासाठी जर मेहनत घेतली नाही, तर शेवटी सगळेच मागे राहतील. जे मेहनत आणि चिकाटीने काम करतील त्यांनाच मी अधिक गुण देणार आहे', बापू म्हणाले.

सर्व मुलांवर बापूंची प्रेमळ नजर होती. त्यामुळे सगळ्याच मुलांवर त्याचा परिणाम झाला.

## (१६)

फिनिक्सच्या शाळेत विद्यार्थ्यांना निबंधासाठी विषय देण्यात आला होता – पहिला सत्याग्रही कोण ?

कोणी लिहिलं थंबी नायडू हा पहिला सत्याग्रही. त्याने दक्षिण आफ्रिकेतील लढतीत पुढाकार घेतला होता.

काहींच्या मते, बाकी कुणी नाही, बापूजी हेच पहिले सत्याग्रही.

इतर कुणी देशाच्या स्वातंत्र्यासाठी हुतात्मा झालेल्या नारणस्वामींना पहिला सत्याग्रही ठरवलं.

हे सगळे निबंध वाचण्यात आले. या निबंधांसाठी ठीक, असा शेरा मारण्यात आला होता. बापूंनी मात्र सगळ्या विद्यार्थ्यांना नापास ठरवलं. सगळेच विचारात पडले. यापैकी कुणीच नाही तर मग पहिला सत्याग्रही कोण?

बापूंनी सगळ्यांची उत्सुकता लक्षात घेत सांगितलं, 'पहिला सत्याग्रही थंबी नायडू नव्हे, तर तो आहे भक्त प्रल्हाद!'

बापूजी काही नवं सांगत नव्हते. आपल्या इतिहासात वेगवेगळ्या मुद्यांवर जे सत्याग्रह करून महान झाले, अशांचाच मार्ग बापूंनी अवलंबला होता. बापूजी एक गोष्ट नेहमी नम्रपणे सांगत को, मी कोणताच नवा विचार सांगत नाही. सत्य आणि अहिंसा या दोन्ही गोष्टी इथल्या पर्वतांप्रमाणेच पुराण्या आहेत...

मानवजीवनातील आताच्या परिस्थितीत सत्य-अहिंसा या इतिहासातील गोष्टी ते अवलंबत. त्याचा परिणाम मोठा असे. बापूजींची ही अनोखी हातोटी मौलिक होती.

## (१७)

एकदा कचऱ्याच्या पेटीत टाकलेल्या कागदांत प्रभावतीबेन चिंतातूर चेहऱ्याने काही शोधत होत्या. माता कस्तुरबांनी ते पाहिलं. जवळ जात त्यांनी विचारलं, 'बेन काय शोधताय?

प्रभावती : बा, हिरव्या रंगाचा एक छोटासा कागद यात पडलाय का ते शोधतेय.

बा : एवढ्या कसल्या कागदाची या कचऱ्यात शोधाशोध करतेयस ? काय

लिहिलंयस त्यावर ?

प्रभावती : लिहिलेलं काही नाही. कंदिलाचा प्रकाश थेट तोंडावर येवू नये, यासाठी त्या काचेवर ठेवायचा तो छोटा कागद होता. बापूंचा होता तो. मी कंदिलाची काच साफ करताना तो कुठे तरी पडला. इथेच असेल म्हणून शोधतेय...

ते ऐकून बा तरातरा बापूंकडे गेल्या. बापूंना जाब विचारण्याचा तर त्यांनाच अधिकार. बापूंना त्यांनी विचारलं, 'हे काय ? ती लहान मुलगी तुमच्यामुळे किती हैराण झालीय. किती शोधाशोध करतेय ती तुमच्या त्या कागदाच्या कपट्यासाठी.’

बापू शांतपणे म्हणाले, ‘कागद लहान होता हे खरंय. पण म्हणून तो कुचकामाचा ठरत नाही. त्याच्या जागी त्याचं काम महत्त्वाचं होतं. याकरता त्याला योग्य ठिकाणी ठेवायला हवं होतं. तो जागच्या जागी न ठेवल्याने आता ती शोधाशोध करतेय. पण ती जे करतेय ते योग्यच आहे.'

प्रभावतीच्या शोधाशोधीला यश आलं. तिने सापडलेला तो कागद योग्य ठिकाणी ठेवला, आणि वातावरणातला तणाव संपून सगळ्यांनीच त्यातून योग्य तो संदेश घेतला.

## (१८)

एका मित्राच्या संगतीने मोहन आणि त्याच्या थोरल्या भावाने आगळाच प्रकार केला. त्यांनी घरच्यांना न कळता गुपचूप मांसाहार केला. अर्थात  स्वादासाठी किंवा शौक म्हणून मोहनने मांसाहार केला नव्हता. मात्र मांसाहारामुळे आपण ताकदीने मजबूत होतो, त्यामुळे विदेशींच्या दबावाखाली आपण येवू शकणार नाही, इंग्रजांना हरवून हा देश स्वतंत्र करू शकतो, असा विचार मोहनने या मांसाहारामागे केला होता.

मात्र घरातील वैष्णवी संस्कारामुळे त्यांची घालमेल होत होती. मांस  खाताना खाल्लं. पण संपूर्ण रात्र झोप लागत नव्हती. आपल्या शरीरात शेळी जीवंत आहे आणि ओरडतेय, असं त्यांना वाटायचं. तरीही मांसाहाराचा हा प्रयोग वर्षभर चालला. पाच-सहा वेळा मांसाहार झाला. बाहेर मांसाहार करून  आल्यानंतर घरात भूक नाही, असं सांगताना मोहनला दु:ख व्हायचं. एवढं खोटं बोलायचं? तेही आईसोबत ? त्याच्या मनात या प्रश्नांनी रूदन चाले. मांसाहार करण्यापेक्षाही माता-पित्यांशी खोटं बोलायचं हे अधिक चूकीचं आहे, असं त्यांच्या मनात आलं. आई-वडीलांच्या मृत्यूनंतर हवं तर स्वतंत्रपणे खुलेआम मांसाहार करूया, तोवर मात्र या सगळ्याचा आता त्याग करू... मोहनने निश्चय केला. त्याने आपल्या मित्राला ठामपणे आपला निर्णय सांगितला. मांसाहार बंद.

असाच आणखी एक प्रकार. एका नातेवाईकासोबत मोहनला विडी पिण्याचा नाद लागला. आधी लोकांनी टाकलेल्या विडीच्या थोटकांना शिलगावून त्याचा धूर ओढायचा. विडीतून धूर काढण्यात मजा असते, असें त्याला वाटायचं. एकामागे एक धुराची वलयं तो हवेत सोडायचा. पण विड्या विकत घेण्यासाठी मग खर्च येवू लागला. त्यात वडिलांच्या धाकाची अडचण होती. मग पैसा-दोन पैशाची चोरी करणं सुरू झालं. या सगळ्या प्रकरणाने मात्र  मनातून तो धास्तावला होता. मांसाहारी भावावर पंचवीस-एक रुपयांचं कर्ज देणं झालं होतं. ते कसं चुकवायचं, हा यक्षप्रश्न दोन्ही भावांपुढे होता. मोठ्या भावाच्या हातात सोन्याचं एक कडं होतं, त्यातला एक भाग कापून तो विकून मग दोघांनी देणी भागवली.

या सगळ्या प्रकाराने मोहन भलताच अस्वस्थ झाला होता. त्यातूनच यापुढे कोणत्याही परिस्थितीत चोरी करायची नाही, असा संकल्प त्याने केला. पितृभक्तीला तडा जावू नये म्हणून जी चूक आपल्या हातून झाली, त्याबाबत वडिलांकडे कबुलीजबाब द्यायचा हे त्याने ठरवलं. पण हे करायचं कसं? वडील रागावले तर ? त्यांनी मारलं तर ? कठोर शिक्षा दिली तर ? काही झालं तरी क्षमा मागितल्याशिवाय मनाला शांतता मिळणार नव्हती. मग त्याने एक चिठ्ठी लिहिली आणि धीर करत वडिलांच्या हातावर ठेवली. 'तुम्ही दु:खी होवू नका' असं विनवत त्याने आपल्या सगळ्या चुकांची कबुली त्यात दिली. याशिवाय भविष्यात पुन्हा असं करणार नाही, याची ग्वाहीही या चिठ्ठीद्वारे दिली होती.

वडिलांनी ती चिठ्ठी वाचली. त्यांच्या डोळ्यातून अश्रू ओघळले. चिठ्ठी अश्रुंनी भिजली. त्यांनी डोळे बंद केले. चिठ्ठी चुरगळली. मोहनचे डोळेही अश्रुंनी डबडबले होते...

या प्रसंगाबाबत गांधीजींनी सविस्तर लिहिलंय. ते म्हणतात – त्या अश्रूमोत्यांच्या वर्षावात मी भिजून गेलो आणि शुद्ध झालो. असा अनुभव ज्यांनी अनुभवलाय तेच जाणोत... खरंतर माझ्यासाठी हा सगळा अहिंसेचा वस्तुपाठ होता. माझ्या त्या कबुलीमुळे माझे वडील मात्र माझ्याबाबत निश्चिंत झाले. त्यानंतर त्यांचं अविरत प्रेम मला लाभलं...

## (१९)

कस्तुरबांची तब्बेत फारच नाजुक झाली होती. जेमतेम जीव बचावला होता. पण नंतर रोग पुन्हा बळावला. इतर उपचारांचा उपयोग होत नव्हता म्हणून बापूंनी स्वत:च कस्तुरबांवर निसर्गोपचार सुरू केले. पण मीठ आणि कडधान्य खायचं नाही, यासाठी त्यांनी कस्तुरबांना विनवणी करून बजावलं. या संदर्भात विद्वान वैद्यांनी जे जे लिहिलंय ते वाचून दाखवलं, समजावलं. पण बा काही ते मानायला तयार नव्हत्या.

बापूंच्या या पथ्याबाबत त्या म्हणाल्या, 'मीठ आणि कडधान्य खाणं थांबवायला तुम्हाला कोणी सांगितलं तर तुम्हीही ते करणार नाही.'

कस्तुरबांच्या या पवित्र्यामुळे बापूंना दुःख वाटलं. पण बांवर असलेल्या प्रेमाखातर निग्रह करण्याची ही संधी त्यांनी मानली. ते म्हणाले, 'ठीक आहे. मी आतापासून पुढच्या एक वर्षासाठी मीठ आणि कडधान्य खाणं वर्ज्य केलं. तू ते सोडणार की नाही हा आता तुझा प्रश्न आहे.’

बांच्या लक्षात आलं. आपली चूक त्यांना उमगली. पश्चाताप व्यक्त करत बापूंना त्या म्हणाल्या, ‘मला क्षमा करा. तुमचा स्वभाव माहीत असतानाही मी असं बोलले. मी आता मीठ आणि कडधान्य खायचं सोडते. पण तुम्ही उगाच ते करू नका. तुम्ही तुमचा निर्णय मागे घ्या. अन्यथा मला ती शिक्षा वाटेल.’

बापू म्हणाले, ‘तू मीठ आणि कडधान्य सोडून पथ्य करशील, तर त्याचा मला आनंद आहे. तू माझ्यासाठी हा निर्णय घेतला असलास तरी सरतेशेवटी तुझाच फायदा आहे. पण मी एकदा प्रतिज्ञा केली की ती मोडत नसतो. माझा हा संकल्प मी आता सोडणार नाही. मलाही त्याचा लाभ होणार आहे. आणि तू या दोन गोष्टी वर्ज्य केल्यास त्याबाबत ठाम राहण्यासाठी तुला माझी मदतच होईल.’

ते ऐकून बा म्हणाल्या, ‘तुम्ही फारच हट्टी आहात. किती परोपरीने सांगितल तरी तुम्ही मानत नाही...' बा अश्रू गाळत शांत बसून राहिल्या.

मात्र पती-पत्नीतील या प्रसंगाने बापूंना सत्याग्रहासाठी चालनाच मिळाली आणि त्यावरचा विश्वास अधिक दृढ झाला. प्रेमातून केलेल्या या त्यागाने दुसऱ्याच्या हृदयातील आपलं स्थान अधिक बळकट होतं, ही सत्याग्रहाची  किमया आहे.

या प्रसंगाबाबत बापू म्हणतात - माझ्या जीवनातील गोड प्रसंगापैकी ही एक घटना आहे.

## (२०)

१९४७ सालच्या ऑगस्ट महिन्यातील १५ तारीख. भारताचा स्वातंत्र्यदिन. सातासमुद्रापार ज्यांचं साम्राज्य पसरलं होतं, ज्यांच्या सत्तेवरील सूर्य कधी ढळला नाही, ते ब्रिटिश राज्यकर्ते हिंदवासियांच्या हातात सगळी सूत्र देवून शांतपणे भारताचा निरोप घेवून निघून गेले.

मात्र या ऐतिहासिक दिवशी राष्ट्रपिता कुठे होते ? हा दिवस आणण्यासाठी ज्याचा सगळ्यात मोठा वाटा होता, जो रात्रंदिवस यासाठी झटला, तो या उत्सवाच्या दिवशी काय करत होता ? स्वातंत्र्य मिळालं पण अजून खूप मोठी कामं करायची बाकी होती. फाळणीची वेदना संपत नव्हती, समाजात सौहार्द होत नव्हता. त्यामुळे राष्ट्रपिता होता तो दु:खी-पीडित देशवासियांमध्ये. कोलकत्यात धार्मिक विद्वेष भडकला होता, तो शांत करायला हा महात्मा तिथे दाखल झाला होता. आझादीच्या त्या रात्री गांधीजी कुठे, कशा अवस्थेत निवाऱ्याला होते ?

बेलियाघाट हा कोलकात्यातील गरीब आणि संवेदनक्षम विभाग. तिथल्या एका गरीबाच्या घरात त्या रात्री राहणं बापूंनी पसंत केलं. तिथे त्यांच्यासाठी एका मोठ्या पाटावर बापूंची झोपण्याची व्यवस्था केली. त्यांच्यासोबतचे इतर सहकारी खाली मिळेल तिथे पथारी टाकून झोपायची तयारी करत होते.

बापू त्यांच्याजवळ आले आणि म्हणाले, ‘मी असा छत्रपलांगावर झोपणार आणि तुम्ही खाली, हे योग्य नव्हे. माझें अंथरूणही खाली जमिनीवर टाका…’

बापूंना तिथे ते जुनाट बाकडं वजा मोठा पाट हा छत्रपलंग वाटला. ते खालीच सहकाऱ्यांत झोपले.

राजधानी दिल्लीसहित देशभर लोक स्वातंत्र्याचा जल्लोष करत असताना तिकडे बापू मात्र गरीबांसोबत त्यांच्या दु:खात सहभागी होत त्यांचे अश्रू पुसत होते.

## (२१)

विलायतेतून बॅरिस्टर होवून गांधीजी मायदेशात परतले. मात्र वकिली चालत नसल्याने तरूण मोहनदासपुढे उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाला. पर्यायी उद्योग काय करायचा? याचा शोध तो घेत होता. वकील म्हणून लोकांचे अर्ज-निवेदनं तयार करून देण्याचं काम त्याला नीट जमत होतं. पण अशी  कामं मोफत करून घेण्यासाठी त्यांच्याकडे लोकांची गर्दी होत होती. यातून पोट कसं भरणार ? आणि अशी मोफत सेवा द्यायला कुठला तरूण उत्साहाने तयार होईल?

कोर्टात उभं राहून युक्तीवाद करणं जमलं नाही. त्यामुळे वकिली सोडून नवा मार्ग शोधण्याचे प्रयत्न सुरू झाले.

मोहनला स्वत:ला आपण शिक्षकी पेशा स्वीकारावा, असं वाटत होतं. आपला इंग्रजीचा अभ्यास तर चांगला आहे. एखाद्या शाळेत मॅट्रिकच्या वर्गात इंग्रजी शिकवण्यासाठी काम मिळालं तर ते करूया, असं त्याने ठरवून टाकलं. त्यातून पोट भरण्याची व्यवस्था होणार होती.

अशातच एका वर्तमानपत्रात एक जाहिरात झळकली. एका हायस्कूलमध्ये रोज एक तास इंग्रजी विषय शिकवण्यासाठी शिक्षक हवा होता. पगार होता ७५ रूपये. मोहनदासचा अर्ज पोचला. थेट मुलाखतीला बोलावण्यात आलं. तरूण बॅरिस्टर शिक्षक बनण्यासाठी उत्साहाने गेला. मात्र घडलें भलतचं.

तिथल्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्याला नोकरी देण्यास असमर्थता दर्शवली. मोहनदास बी. ए. नाही हे कारण देत त्याची मुलाखत संपवली. मोहनने त्यावर युक्तीवाद केला.

मोहन : पण मी लंडनमध्ये मॅट्रिक्युलेशन केलंय. लॅटिन ही माझी दुसरी भाषा होती.

मुख्याध्यापक : ते खरंय. पण आम्हाला पदवीधर हवाय.

मोहन शिक्षक व्हायला अपात्र ठरला.

मोहन बॅरिस्टर असला तरी शिक्षकच काय, पण उपजिविकेसाठी  कोणतंही प्रामाणिक काम करायला तो तयार होता.

मात्र शिक्षकी पेशा मिळाला नाही. पण पुढे या माणसाने काय काम केलं ते जगजाहीर आहेच. नम्रता, साधेपणा, आणि सत्याचा आग्रह या मूल्यांच्या आधारे बापू अखिल मानवजातीचे शिक्षक झाले.

## (२२)

आगाखान पॅलेसमध्ये बा आणि बापू कैदेत होते. या ठिकाणी बापूंचे इतर साथी आणि जेलचे प्रमुख केटली हे कस्तुरबांसोबत कॅरम खेळत असत. पंच्याहत्तरीच्या बांनी डाव जिंकावा यासाठी सगळेच प्रयत्न करत. काही वेळा बापूही रंगलेला डाव पाहायला उभे रहायचे. कधी तेही एखादा डाव खेळायचे.

शारीरिक कसरत व्हावी या हेतूने काही मैदानी खेळही या ठिकाणी व्हायचे. पावसाळ्यात जेलच्या अधिकाऱ्यांनी एका खोलीत टेबलटेनिस खेळण्याची व्यवस्था केली. या खेळाचं उद्घाटन बा आणि बापूंनी करावं, असं तिथल्या सगळ्यांनीच ठरवलं.

झालं. दोघांनीही इतरांचा हिरमोड केला नाही. दोन बाजूला दोघेजण हातात रॅकेट घेवून सज्ज झाली. कोण जाणे? बापूंनी किती वर्षांनी हातात रॅकेट घेतलं होतं?

पहिली सर्व्हिस बांच्या हातात होती.

बापू म्हणाले : आता काहीही होवो. पाहतोच...

बा : हो, काही होवो. पण तुम्ही रडीचा डाव खेळायचं नाही.

बापू : तुझ्याकडून मी हरणारच आहे. आणि तुझ्याकडून हरावला मला मनापासून आनंद होतो. बापूंच्या या वक्तव्याने सारेच खळखळून हसले.

मग बापू सगळ्यांना म्हणाले, 'नवऱ्याने बायकोकडे जर कधी आपली हार कबूल केली तर त्या भगिनींची ताकद दुप्पटीने वाढते. यातुन पुढे समाजातील अनेक बंद कवाडं आपोपाप उघडली जातात...’

त्यानंतर बांकडे वळत बापू म्हणाले, ‘तुझ्याकडून पराभूत होताना मी खूप काही जिंकत असतो. तुझी साथ आहे म्हणूनच मला शोभा आहे.'

एकमेकांकडे आपली हार कबूल करत परस्परांना जिंकणाऱ्या या अनोख्या दाम्पत्याकडे सारेच प्रसन्नतेने पाहत होते.

## (२३)

गांधीजींचं कार्य म्हणजे सातत्याने वाहणारा नायगारा धबधबा.

पण सतत एवढी कामं करत असतानाच मध्येच विश्रांती घेवून नवी शक्ती घेण्याची त्यांची पध्दत अद्भुत होती. काम करताना थकवा आला की ते काही क्षण झोप घेत. त्यानंतर पुन्हा ताजेतवाने होवून कामाला हजर.

एक छोटी डुलकी घेवून कामाचा डोंगर पार पाडण्यासाठी ते सज्ज व्हायचे. सकाळी मालीश झाल्यावर पाण्याच्या कुंडात बसून ते थोडी झोप घेत. ही विश्रांती घेत असताना मनुबेन बापूंची दाढी करायच्या. पण मनुबेनला नेहमी  वाटायचं की बापूंना झोप लागता असताना दाढी केल्यास त्यांची झोपमोड  होईल, म्हणून ती थांबत असे. पण इतरांकडून वेळेत काम करून घेण्यास बापू नेहमीच जागृत असत.

मनुबेनना समजावताना ते म्हणाले, 'मी ही झोप घेत असतो त्याच काळात माझी दाढी करण्याचं काम सुरू रहायला हवं. त्यामुळे वेळेचा अपव्यय होत नाही. दोन्ही कामं एकदम होतात. पण तुझ्या ते लक्षात येत नाही का? मला त्याचा परिणाम भोगावा लागतो.

मनुबेन : बापूजी तुमची कमाल आहे. एवढे थकून केवळ पाच-सात मिनिटे झोप घेता. त्यातही मी दाढी करायची असा तुमचा आग्रह. तुम्हाला अशी झोप तरी कशी घेता येते?

बापू : ज्या पद्धतीने मी विश्रांती घेतो ते चितेचं कारण नाही. पण ज्यावेळी अशा पद्धतीने क्षणभर विश्रांती घेण्याची माझी शक्ती संपेल, त्यावेळी माझं पतन झालंय असं समज. आणि हे पतन माझ्यात दंभ आल्याने तसंच हृदयात रामनाम नसल्याने होतंय, असं मला वाटेल. काही क्षणांच्या झोपेने मला ईश्वर पुन्हा काम करायची नवी शक्ती देतो. त्यामुळे मला चिंता नाही. म्हणूनच तुही ईश्वरावर श्रद्धा ठेव. आपली काळजी घेणारा तो बसला आहे. म्हणूनच ईश्वरावर भार ठेवून तू तुझं काम सुरू ठेव. देव कुणाचं नुकसान करत नाही. माणूसच माणसाचं वाईट करतो आणि वर देवाने वाईट केलं, असं म्हणत असतो.'

## (२४)

देशबंधु दास दार्जिलींगमध्ये आजारी होते. गांधीजी त्यांची विचारपूस करण्यासाठी गेले. तिकडून परतताना ढाका मेलने नवाबगंजमधील एका कार्यक्रमासाठी येण्याचं त्यांनी मान्य केलं होतं. पण खडबडीत रस्ते आणि दरडी कोसळल्याने ढाका मेल गाठणं अवघड बनलं होतं. वेळेत ण पोहचणं हे तर गांधीजींना न पटणारं. त्यामुळे ते अस्वस्थ झाले होते.

यात एका सहकाऱ्याने बापूंना स्पेशल ट्रेनने जाण्याचा प्रस्ताव दिला. त्यांनी तो मानला. ते म्हणाले, 'व्हॉईसरायला दिलेली वेळ मी जशी नेमकी पाळतो, तशाच पद्धतीने माझ्या लोकांना दिलेली वेळ मला पाळायला हवी.'

त्या स्पेशल ट्रेनचं भाडं १,१४० रुपये द्यावं लागलं. पण देशबांधवांना दिलेल्या शब्दानुसार त्यांच्यासोबतच्या कार्यक्रमासाठी निश्चित वेळेत बापू हजर होते.

## (२५)

गांधीजी बिहारच्या चंपारण्यात फिरत असताना तिथल्या आसपासच्या गावात शाळा सुरु करण्यासाठी त्यांनी आपल्या स्वंयसेवकांना कामाला लावलं.

एक दिवस गांधीजी कस्तुरबांना म्हणाले, ‘या मुलांसाठी तू पण एक शाळा सुरू कर.'

कस्तुरबा : 'शाळा सुरू करुन मी काय करु? या मुलांना मी गुजराती शिकवू ? त्यांची भाषा मला येत नाही. मी त्यांच्याशी बोलू तरी कशी ?'

गांधीजी : ‘बालकांना पहिला धडा हा स्वच्छतेचा द्यायला हवा. शेतकऱ्यांच्या मुलांना गोळा करा. त्यांना चांगली अंघोळ घाला, त्यांना साफ-स्वच्छ रहायला शिकवा. त्यांचे डोळे-दात तपासा, हे महत्त्वाचं शिक्षण आहे. त्यात काही अडचण येत नाही. आजपासूनच हे सुरू करता येईल.'

आणि कस्तुरबांची शाळा सुरू झाली.

## (२६)

बापू येरवडा जेलमध्ये होते. तिथे जेवण बनवणाऱ्याने एक मांजर पाळलं होतं. तिला दोन पिल्लं होती. बापू असतील तिथे त्यांच्या पायाशी येवून ही मांजर बसायची. नंतर तिच्यामागे पिल्लंही यायची. ही पिल्लं खेळायची. मांजरीच्या शेपटीला उंदीर समजून ही पिल्लं धावत येत ती शेपटी तोंडाने धरायची. मग मांजर आपली शेपटी सोडवत त्यांना दूर ढकलायची. हा गंमतीदार खेळ सतत सुरू होता. बापू त्यावेळी रस्कीनचं पुस्तक वाचत होते. पण पुस्तक बंद करून ते मांजर आणि पिल्लांचा खेळ बघण्यात दंग झाले.

मग ती पिल्लं बापूंच्या जवळ येऊ लागली. प्रार्थनेच्या वेळीही ती बापूंच्या जवळ बसत. बापूही त्यांची गंमत करत. भूक लागली की बापूंच्या आसपास म्यॉव-म्यॉव करत ती उड्या मारायची.

सरदार वल्लभभाई यायचे तेव्हा तेही या पिल्लांची गंमत करत. मोठ्या ताटावर ठेवायचं जाळीचं झाकण ते या पिल्लांवर ठेवत. आतमध्ये अडकल्यानंतर ही पिल्लं सुटकेसाठी धडपड करायची. एकदा असंच एक  पिल्लू जाळी खालून बाहेर येण्यासाठी धडपडू लागलं. जाळीला धक्के देत सरकत सरकत ते पायऱ्यांजवळ आलं. आणि मग जाळी खाली येताच ते त्यातून बाहेर सटकलं.

त्या पिल्लाने आपली बुध्दी वापरून स्वत:ची सुटका करून घेतली. हा खेळ पाहणारे सारेच अवाक झाले. मात्र ते पिल्लू भेदरलं होतं. त्याची ती अवस्था पाहून बापूंना त्याची दया आली.

थोडं दूर जावून ते पिल्लू शौचासाठी जमीन हुंगू लागलं. एका ठिकाणी त्याने आपल्या पायाने जमीन उकरली. तिथे त्याने शौच करून त्यावर आजूबाजूची माती ओढायला सुरूवात केली. त्या ठिकाणी माती कमी होती म्हणून की काय ते दुसऱ्या ठिकाणी गेलं, त्याने तिथे आपला

नेसर्गिक विधी पूर्ण केला. त्यावर माती ओढून टाकली. याकामी दुसरं पिल्लूही त्याच्या मदतीला आलं.

मांजराच्या त्या पिल्लांची स्वच्छतेबाबतची कृती पाहून बापू फारच प्रभावित झाले. ते म्हणाले, 'या पिल्लांवर आकाशातून पुष्पवृष्टी करायला हवीय...'

मीराबेननी हा प्रसंग लिहून ठेवलाय. मांजरांच्या पिल्लांचा स्वच्छतेबाबतचा आग्रह, त्यासाठी त्यांची नैसर्गिक ओढ यावर त्यांनी सविस्तर लिहिलंय.

मांजरीची ती दोन पिल्लं हे आमच्या विरंगुळ्याचं साधन होतं. पण या पिल्लांनी त्यांच्या आईकडून जीवनाचा वस्तुपाठ घेतला होता. आई त्यांच्यासोबत असायची. पण त्यातील महत्त्वाची गोष्ट होती ती आचरण...

## (२७)

येरवडा तुरूंगात असताना गांधीजींसोबत वल्लभभाई आणि महादेवभाई हे दोन सहकारी होते. गांधीजी आणि त्यांचे हे सहकारी पाहटे चार वाजता उठून प्रार्थना करत. त्यानंतर मध आणि लिंबू पाणी पिण्याचा कार्यक्रम असे. मध आणि लिंबूरस यावर उकळतं पाणी टाकलं जायचं. ते थंड होईस्तोवर थांबायचं. या मधल्या काळात काही वाचन व्हायचं. गांधीजींनी या गरम पाण्याचा लोटा एका कपड्याने झाकायला सुरूवात केली.

त्याबाबत सांगताना ते एक दिवस महादेवभाईंना म्हणाले, 'या फडक्याने मी लोटा का झाकतो ते माहित आहे? अनेक लहान सुक्ष्म जंतू हवेत असतात. ते या गरम पाण्यात पडून मरू नयेत म्हणून.'

वल्लभभाई ते ऐकत होते. न राहून ते म्हणाले, 'एवढ्या टोकाला जावून आपल्याला बुवा अहिंसा पाळता येणार नाही...'

गांधीजी त्यावर हसतच म्हणाले, 'अहिंसा नको, पण स्वच्छता तर पाळता येते ना!'

## (२८)

येरवडा जेलमध्ये कुठल्याही मुद्यावर चर्चा रंगात यायची. एकदा 'प्रसंगी विषारी सापही मोलाचा...' या म्हणीचा उगम कसा झाला, यावर चर्चा सुरू होती.

बापूंनी यासंदर्भात एक कथा सांगत आपलं मत मांडलं – 'एका म्हातारीच्या घरात साप दिसला. तिने आरडाओरडा केल्यावर लोक जमा झाले आणि त्यांनी तो साप मारला. म्हातारीने तो मेलेला साप दूर फेकून देण्याऐवजी घराच्या छपरावर ठेवला. आकाशातून एक ससाणा उडत होत. कुठून तरी उचललेला मोत्याचा हार त्याच्या पायात होता. त्याने वरून छपरावरचा तो साप पाहिला. मग तो खाली आला. त्याला त्या सापापेक्षा बहुमोल ते काय? आपल्या पायातील मोत्याचा हार खाली टाकून तो साप उचलून ससाणा उडून गेला. म्हातारीला सापाच्या बदल्यात मोत्याचा हार सापडला...'

वल्लभभाईंनी मग आपली गोष्ट सांगितली – 'एका वाण्याच्या घरात साप शिरला. पण त्याला मारायला इतर कुणीच नव्हतं. वाण्याला साप मारायची हिंमत होईना आणि प्राण्याला मारायचं म्हणजे पाप, असंही त्याला वाटत होतं. त्यामुळे त्या वाण्याने त्या सापावर तपेलं टाकून त्याखाली त्याला झाकून ठेवलं. रात्री वाण्याच्या घरात चोर शिरला. तपेल्याच्या खाली काही असेल म्हणून त्याने ते उपडी करताच सापाने चावा घेतला. चोराला चोरीच्या बदल्यात पंचतत्व लाभलं.

या दोन्ही गोष्टी ऐकल्यानंतर प्रत्येकजण आपापल्या स्वभावानुसार अन्वयार्थ लावत कसा गोष्टी सांगतो, यावर नंतर चर्चा रंगली होती.

## (२९)

जोहान्सबर्गमध्ये असतानाचा प्रसंग. गांधीजी सकाळी लवकर उठून प्रार्थना करत, कधीकधी दळण दळत. त्यांनतर चूल पेटवून त्यावर पाण्याची किटली ठेवत असत.

घरातील वापरासाठी तसंच शौचालयासाठी लागणारं पाणी आठ-दहा फूट उंचीवर असलेल्या एका टाकीतून घ्यावं लागत होतं. स्नानासाठी पाणी त्यातूनच काढावं लागे. या टाकीच्या स्वच्छतेसाठी आठवड्यातून एकदा महापालिकेतील निग्रो कर्मचारी यायचे. दोन घोड्यांच्या गाडीतून ते यायचे आणि साफसफाई करायचे. सफाई काम करताना हे कर्मचारी पूर्ण भिजून जायचे. त्यात कडाक्याच्या थंडीत थरथर कापायचे. मग ते गांधीजींजवळ यायचे. गांधीजी स्वत: चहा बनवून त्यांना द्यायचे. हा नेहमीचाच क्रम होता. गरम-गरम चहा पिताना हे कर्मचारी आपला डावा हात वर करत गांधीजींचे आभार मानायचे. झुलू भाषेत ते म्हणायचे, 'कोस बाबा फेझलू.'

याचा अर्थ - ईश्वर आपल्या पाठीशी आहे, याची खात्री तुम्ही आम्हाला गरम गरम चहा देऊन थंडीपासून वाचवता त्यातूनच होते.

## (३०)

सेवाग्राम आश्रमात एकदा अमेरिकन मिशनरी डॉ. जॉन आले होते. त्यांनी गांधीजींना विचारलं : 'तुमच्या जीवनातील सगळ्यात सर्जनात्मक अनुभव कोणता ? ज्यामुळे तुमचं जीवन इतकं सर्जनशील झालं...'

यावर गांधीजी म्हणाले, 'असे अनुभव खूप आहेत. पण तुम्ही प्रश्न विचारल्यानंतर मला एक प्रसंग जरूर आठवला ज्यामुळे माझं जीवन बदललं.'

गांधीजींनी मग मारित्सबर्ग येथे घडलेला प्रसंग सांगितला -

गांधीजी बॅरिस्टर झाले तेव्हा २४ वर्षांचे होते. मात्र मुंबईत काम मिळत नव्हतं. यातच दक्षिण आफ्रिकेतील अब्दुल्ला सेठ यांनी एका केससाठी गांधीजींना बोलावून घेतलं. गांधीजी डर्बनला पोहोचले. अब्दुल्ला शेठनी त्यांना प्रिटोरिया इथे पाठवलं. त्यासाठी रेल्वेचं पहिल्या वर्गाचं तिकिट देऊन त्यांना गाडीत बसवलं. नऊ वाजण्याच्या सुमारास नाताळची राजधानी मारित्सबर्ग इथे गाडी पोहचली. तिथे एक गोरा प्रवासी आत शिरला. पहिल्या डब्यात गोरा वर्ण नसलेला तो प्रवासी पाहून त्याला संताप आला. खाली उतरून त्याने एका शिपायाला बोलावलं. तो शिपाई काही बोलला नाही. मात्र दुसरा शिपाई आला आणि त्याने गांधीजींना शेवटच्या डब्यात जायला बजावलं.

'पण माझ्याजवळ पहिल्या वर्गाचं तिकिट आहे,' गांधीजी म्हणाले.

'मग काय झालं? मी सांगतो ना तुम्ही शेवटच्या डब्यात जा,' शिपाई.

'आधी मी सांगतो ते ऐका. मला या डब्यात डर्बनमध्येच बसवण्यात आलेलं आहे. आणि मी इथे बसूनच प्रवास करणार,' गांधीजी ठामपणे म्हणाले.

'ते काही नाही. उतरावंच लागेल, नाही तर तुम्हाला जबरदस्तीने खाली उतरवू...'

'मी उतरणार नाही. तुम्हाला योग्य वाटतं ते करा', तरुण गांधीजींनी ठामपणे सांगितलं.

शिपायांनी मग गांधीजींचे हात धरत त्यांना खेचलं आणि धक्के देत डब्याबाहेर हाकललं. मात्र त्याही परिस्थितीत दुसऱ्या डब्यात जायला त्यांनी नकार दिला. ट्रेन निघून गेली.

गांधीजी वेटिंग रूममध्ये गेले. त्यांनी केवळ आपलं पाकिट सोबत घेतलं. आपल्या इतर बॅगा त्यांनी उचलल्या नाहीत. मात्र रेल्वे कर्मचाऱ्यांनीच त्या बॅगा उचलून बाजूला नेवून ठेवल्या. कडकडीत थंडी पडली होती. दक्षिण आफ्रिकेसारख्या उंच प्रदेशात गोठवणारी थंडी असते. गांधीजींचा ओवरकोट बॅगेत होता. मात्र कर्मचाऱ्यांकडून बॅगेतला ओवरकोट मिळेल की नाही, अपमान होईल का, याची शंका होती.

तरूण गांधीजींच्या मनात मंथन सुरू झालं. स्वत:च्या हक्कासाठी लढायचं की इथूनच आपल्या देशात परतायचं? की हा अपमान सहन करुन आपलं काम करायचं? पण केस तशीच टाकून जाणं हे तर नार्मदाचं. लक्षण...

सगळा विचार करताना गांधीजी दु:खी झाले होते. मात्र हा मोठा रोग आहे तो वर्णद्वेषाचा. हा रोग समूळ नष्ट करायला हवा. त्यासाठी हे दु:ख सहन करून अधिक ताकद मिळवायला हवी. हाच निर्णय घेऊन गांधीजी पुढच्या गाडीने निघून गेले.

हा प्रसंग सांगून गांधीजी म्हणाले, 'असा तो सर्जनात्मक अनुभव होता. त्यावेळी मला जिवाची भीठी वाटली होती. अंधाऱ्या वेटिंगरूममध्ये मी बसलो होतो. तिथे एक गोराही होता. मला त्याची भीती वाटली. पण मग माझा धर्म कोणता? मी स्वत:लाच प्रश्न केला. मी हिंदुस्थानात परत जावू की देवावर विसंबून इथल्या परिस्थितीचा सामना करू? मी म्हटलं, इथे राहून थोडं सहन करू. त्या दिवशी अंहिसेच्या मार्गावर मी पहिलं पाऊल टाकलं होतं.'

गांधीजींचा सगळ्यात मोठा गुण म्हणजे त्यांची निर्भयता, हे जवाहरलाल नेहरुही वारंवार सांगत. नेहरू स्वत: निर्भय असल्याने त्याची कदर ते करणारच ना? पण ते म्हणायचे की, गांधीजींची निर्भयता अशा प्रकारची होती की, त्यांच्या संपर्कात येणारा प्रत्येक माणूसच नव्हे तर वातावरणही निर्भय होऊन जायचं.

गांधीजींच्या या निर्भयतेचं मूळ प्रत्येकाविष्यी त्यांच्या मनात असलेल्या प्रेमात आहे.

त्या रात्री थंडीत कुडकुडणाऱ्या नवतरूण गांधीजींच्या हृदयात द्वेष, सूड याची भावना आली नाही, तर अहिंसा, आत्मसम्मान यासाठी बलिदान करण्याच्या प्रेरणेला चालना मिळाली. भय नष्ट झालं. यातुन सत्याग्रहसारख्या परिणामकारक शस्त्राचा शोध लागला.

## (३१)

फिनिक्स आश्रमात संध्याकाळी प्रार्थना आटोपल्यानंतर नेहमीप्रमाणे विविध विषयांवर चर्चा झाली. यात एकदा गृहस्थाश्रमाबाढत बा-बापूंमध्ये फारच अजब, पण उद्बोधक चर्चा झली.

दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने एक नवा कायदा केला. यानुसार तिथल्या हिंदू, मुसलमान वा पारशी यांच्या शर्मप्रथेप्रमाणे होणाऱ्या लग्नांना मान्यता मिळणार नाही, असं तिथल्या सरकारने जाहीर केलं.

यावर बापू बांना म्हणाले, 'ऐकलं का, आजपासून तू माझी लग्नाची बायको नाहीस, तर बेकायदेशीर बायको आहेस...'

बा : 'आता हे काय बोलताय तुम्ही ? तुम्ही तर रोज नव-नवा युक्तीवाद शोधून काढता.'

बापू : 'अगं, हे मी म्हणत नाही. जनरल स्मट्स याने तसं बजावलंय. त्याच्या सरकारने याबाबत नवा कायदा केलाय. ख्रिश्चन धर्माप्रमाणे आपल लग्न कोर्टात नोंदलेलं नाही. त्यामुळे हिंदू, मुसलमान आणि पारशी यांची लग्न बेकायदेशीर ठरवण्यात आली आहेत. त्यामुळे आपली लग्नाची बायकोही या कायद्यामुळे बेकायदेशीर ठरली आहे.'

बा : 'काय म्हणताय? त्यांना हे काय सुचतं ?'

बापू : 'पण आता तुम्ही बायका यावर काय करणार ?'

बा : 'आता आम्ही बापड्या काय करणार ?'

बापू : 'का? आम्ही जसं लढतोय तसं तुम्ही पण लढायला सज्ज व्हा. स्वत:च्या अब्रूसाठी जेलमध्ये जाण्याची तयारी ठेवायला हवी.'

बा : 'बायका कशा काय जेलमध्ये जातील ?'

बापू : 'का नाही ? पुरूष जी सुख-दु:खे भोगतो, ती स्त्रियांनी का भोगू नये? रामाच्या सोबतीने सीतेनेही वनवास भोगला. हरिश्चंद्राच्या मागे तारामती आणि नळराजासोबत दमयंती या सगळ्यांना सारखेपणे अनंत वेदनांना सामोरं जावं लागलं.’

बा हसत म्हणाल्या : ‘तुम्हाला मला जेलमध्ये पाठवायचं आहे तर ? आता तेवढंच बाकी राहिलंय. पण मला तिथलं अन्न खाता येईल? फलाहार करायला देतील ?'

बापू : ‘त्यासाठी परवानगी मिळेपर्यंत उपवास कर.’

बा : ‘तुम्ही तर माझ्या जिवावरच उठलात...’

बापू (खळखळून हसतात) : ‘तू जेलमध्ये मेलीस ना, तर मी तुझी जगदंबेसारखी पुजा करीन.’

बा : ‘(ठामपणे) असं ना? मग माझं नाव सत्याग्रहींत पहिलं ठेवा...'

आणि घडलं तसंच. सोळा सत्याग्रहींची जी पहिली तुकडी निघाली त्यात बा सगळ्यांच्या पुढे होत्या. १९४२च्या 'चले जाव' आंदोलनात बा बापूंसोबत जेलमध्ये गेल्या. २२ फेब्रुवारी १९४४ साली आगाखान पॅलेसमधील बंदीवासात बापूंच्या मांडीवर डोकं ठेवून कस्तूरबांनी देह त्यागला. त्यावेळी त्यांच्या धैर्यवान पतीचे दोन्ही डोळे अश्रूंनी चमकत होते.

## (३२)

दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहात अनेक सत्याग्रही पोलिसांच्या गोळ्यांनी शहीद झाले. आंदोलन संल्यानंतर शहीदांच्या विधवा गांधीजींना भेटायला शेठ पारसी रुस्तमजी यांच्या निवासस्थानी आल्या.

गांधीजी स्वत: उठून त्यांच्यापाशी गेले. त्यांना वंदन केलं. त्या विधवा भगिनींना रडू कोसळलं.

गांधीजी त्यांची समजूत काढू लागले : मातांनो, तुम्ही शोक आवरा. दीर्घ आजाराने तुमच्या पतीचा मृत्यू झाला असता, तर दुनियेला त्याचं सोयर-सुतक नसतं. पण देशासाठी त्यांनी गोळ्या झेलल्याने त्यांना देवत्व प्राप्त झालं, एवढे ते भाग्यशाली आहेत.

त्यातील एक महिला बापूंचे पाय पकडून रडू लागली. तिचे अश्रू त्यांच्या पायावर ओघळले. गांधीजींचा आवाजही कातरला. तिच्या खांद्यावर हात ठेवत ते म्हणाले : बहिणी, तुझं दु:ख मला सहन होत नाही. ज्या दिवशी सरकार  मलाही गोळ्या घालील आणि माझ्या पत्नीची तुमच्या सारखीच स्थिती होईल, त्यावेळीच या स्थितीचा अंत होईल.

गांधीजींच्या या पारदर्शक सहृदयतेने त्या भगिनींच्या दु:खावर फुंकर घातली गेली.

## (३३)

साबरमतीच्या तटावर गांधीजींनी ‘सत्याग्रहाश्रमा’ची स्थापना केली. तिथे गांधीजींचे विविध प्रयोग सुरु होते. आश्रमातील एका कार्यकर्त्यावर बाजारातून वस्तूंची खरेदी करून आणण्याची जबाबदारी होती. मात्र काही काळाने तो अप्रामाणिक झाला. दोन आण्याची वस्तू तो अडीच आण्याला आणली, असं हिशेबात लिहायचा. त्याची ही चोरी आश्रमातील गांधीजींच्या दोन सहकाऱ्यांच्या लक्षात आली, साहजिकच ही गोष्ट मग गांधीजींपर्यंत पोचली.

गांधीजींनी संबंधित कार्यकर्त्याला बोलावून घेतलं. मात्र त्याने आपण अप्रामाणिकपणे काही करतोय, हे कबूल केलं नाही. पण नंतर त्याला उपरती  झाली आणि त्याने आपला गुन्हा कबूल केला. गांधीजींना आश्रमातील या प्रकाराचा मोठा आघात होता. नाताळमधील वास्तव्यापासून तो कर्मचारी गांधीजींच्या सोबत होता.

या प्रकारावर गांधीजींच्या मनात मंथन सुरू झालं होतं. या आश्रमाचं ‘सत्याग्रहाश्रम' हे नाव खऱ्या अर्थाने सार्थकी लागून त्याचा लौकिक कसा वाढेल? माझ्यातच काही असत्य गोष्ट लपलेली असेल. तिलाच आधी शोधून दुर करायला हवी.

गांधीजींनी मग आपल्या सगळ्या सहकार्यांना एकत्र बोलावलं. अगदी जे कामासाठी बाहेर गेले होते त्यांनाही बोलावून घेतलं. त्या सगळ्यांपुढे त्यांनी आपल्या हृदयातील वेदना बोलून दाखवली. एका वेगळ्याच पातळीवर त्यांनी आपले विचार मांडले. बाह्य प्रतिष्ठेला सत्याशिवाय काहीही किंमत नाही. म्हणूनच 'सत्याग्रहाश्रम' या नावाला काही किंमत नाही. आपण 'सत्याग्रहाश्रम' ऐवजी 'उद्योगमंदिर’ हे नाव आश्रमाला देवू. यामुळे बाहेरच्या दुनियेच्या दृष्टीने आपली प्रतिष्ठा खाली येईल, पण जे नाव धारण करायचं त्याच्याच विपरित वागायचं या खोटेपणातून आपली सुटका जरूर करून घेता येईल.

यावर मग बरीच चर्चा झाली. सरतेशेवटी सगळ्यांनी मिळून असा निर्णय घेतला की नदीतटावर जिथे प्रार्थना केली जाते, त्या जागेलाच 'सत्याग्रहाश्रम' असं संबोधायचं, आणि

उर्वरित सगळ्या आश्रमाला 'उद्योगमंदिर' असं म्हणायचं. पुढे ज्या दिवशी योग्यता प्राप्त होईल त्या दिवशीच संपूर्ण आश्रमासाठी 'सत्याग्रहाश्रम' हे नाव धारण करू, असा निर्णय झाला.

## (३४)

नोआखलीत धार्मिक दंगलीचा वणवा भडकला होता. गांधीजी या भागात शांततेचं आवाहन करत फिरत होते. ३० जानेवारी १९४७ रोजी (गांधीजींचा खून झाला, त्याच्या बरोबर एक वर्ष आधी) ते एका गावात आले होते. त्या गावात गांधीजींसाठी बकरीचं दूध मिळणं कठीण होतं. मग त्यांना ओल्या नारळाचं दूध करून देण्यात आलं. त्यांनी ते आनंदाने घेतलं. मात्र संध्याकाळी त्यांना थोडासा अशक्तपणा जाणवू लागला.

संध्याकाळी शौचानंतर त्यांना अचानक घाम येवू लागला. जांभया सुरु झाल्या. त्यांच्यासोबत मनुबेन होत्या. गांधीजी बेशुध्द होतायत की काय अशी परिस्थिती होती. मनुबेननी गांधीजींना नीट पकडून एका सहकाऱ्याच्या मदतीने खाली झोपवलं. त्यांच्या अंगावरील घाम पुसला.

मनुबेननी लगेच डॉ. सुशीला नायर यांना गांधीजींच्या या प्रकृतीविषयी तातडीने सविस्तर माहिती देणारी चिठ्ठी लिहिली.

काही वेळाने गांधीजींनी डोळे उघडले. मनुबेनला जवळ बोलावून ते म्हणाले : 'तू मला इथे झोपवण्यासाठी कुणाला बोलावलस, हे मला आवडलं नाही. पण तू अजून लहान असल्याने मी तुला क्षमा करतो: अशा प्रसंगी पूर्ण भक्तीनिशी रामनामाचा जप करायचा असतो. मीही रामनामाचा जप करत होतो. असो. आता ही माझ्या आजाराची गोष्ट इतर कुणालाही कळता कामा नये, अगदी सुशीलालाही नाही. माझा खरा वैद्य-डॉक्टर हा 'राम'च आहे. माझ्याकडून त्याला जेवढं काम करून घ्यायचं आहे तेवढंच तो मला जिवंत ठेवेल, नाहीतर वर उचलून घेईल.'

हे सगळं ऐकून मनुबेनला धक्काच बसला. तिने डॉ. सुशीलाला लिहिलेली चिठ्ठी लगेच फाडून टाकली. मनुबेनने काय केलं ते बापूंच्या लक्षात आलं. ते म्हणाले : 'तू चिठ्ठी लिहून मोकळीही झालीस ?'

मनुबेनने मानेने 'हो' म्हटलं.

बापू म्हणाले : ‘आज ईश्वराने तुला नी मला खरच वाचवलं. सुशीला गावातील आरोग्यसेवेचं पवित्र काम अर्धवट टाकून धावत आली असती, आणि देव आपल्या दोघांवरही कोपला असता...’

## (३५)

दक्षिण आफ्रिकेत जोहान्सबर्गमध्ये गांधीजी वकिली करत होते, तेव्हाची गोष्ट. घरापासून त्यांचं ऑफिस तीन मैल लांब होतं. गांधीजींसोबत श्री. पोलाकही काम करत होते. एकदा पोलाक यांनी गांधीजींचा तेरा वर्षीय मुलगा मणिलाल याला कार्यालयातून एक पुस्तक घरी घेवून यायला सांगितलं होतं. पण मणीलाल ते काम विसरला. ही गोष्ट गांधीजींना समजली. ते घरी आले.

प्रेमाने पण ठामपणे ते मणीलालला म्हणाले : 'आता रात्र झालीय. अंधारात रस्ताही तसा बरा नाही. यायला-जायला सहा मैलाचे अंतर आहे. पण तू पोलाक यांना कबूल केलं होतंस, त्यामुळे आता जा आणि पुस्तक घेवून ये...'

या प्रसंगाने बा आणि घरातील सगळेच अचंबित झाले. एवढ्या रात्री बापू आपल्या मुलाला या कामासाठी का पाठवतायत, त्यांचा हा आग्रह कशासाठी, असा सवाल सगळ्यांनीच केला. गांधीजी मात्र ठाम होते. अखेर ऑफिसमधील त्यांचे सहकारी कल्याणभाईंनी त्यात हस्तक्षेप करत म्हटलं : 'हवं तर मी पुस्तक आणायला जातो किंवा मणीलालसोबत मला जावू द्या.'

गांधीजींनी दुसऱ्या पर्यायाला संमती दिली.

आपल्या किशोरवयीन मुलाला एवढ्या रात्री पोलाककरीता पुस्तक आणण्यासाठी गांधीजींनी पाठवलं. आपण स्वीकारलेलं काम वेळीच पार पाडायला हवं, याचा धडा त्यांनी मुलाला दिला. हे करतानाच त्यांनी त्याची योग्य काळजी घेतली. फुलासारखा कोमल पण प्रसंगी वज्राहून कठोर असलेल्या या पित्याचं दर्शनही त्यावेळी मुलाला झालं.

## (३६)

नोआखलीतील जातीय दंगलीची आग विझवण्यासाठी गांधीजी पायी चालत या भागात यात्रा करत होते. एका गावाकडून निघायचं आणि दुसऱ्या गावात सकाळी सात वाजता पोहचायचं. तिथे पोहचल्यावर आपलं रोजचं लिखाणाचं काम करून आंघोळ करत. आंघोळीसाठी ते साबण वापरत नसत. पण एक खरखरीत चपटा दगड अंग घासण्यासाठी त्यांना लागे. मिराबेन यांनी काही वर्षापूर्वी तो दगड शोधून दिला होता.

एका गावात पोहचल्यानंतर गांधीजी आंघोळीला जाण्याची तयारी करत होते. मात्र सोबत असलेल्या मनुबेनला गांधीजींचा तो आंघोळीचा दगड काही मिळत नव्हता. मनुबेन बापूंना म्हणाल्या : 'काल आपण ज्या घरात राहिलो होतो. तिथेच राहिला असावा. आता काय करू ?'

बापू काही क्षण विचारात पडले. मग म्हणाले, 'तो दगड तू शोधून आण. त्यासाठी तू एकटीच जा. एकवेळ तुला ही शिक्षा झाली की तू पुन्हा विसरणार नाहीस.'

मनुबेन : 'एखाद्या स्वयंसेवकाला सोबत नेवू का ?'

गांधीजी : 'कशासाठी ?'

नोआखालीत नारळ आणि सुपारीच्या मोठ्या बागा होत्या. त्यातून चालताना नवखा माणूस वाट चुकणारच. सुनसान रस्ते, त्यात एकटं कसं जायचं? काही कठीण प्रसंग उद्भवला तर? १५-१६ वर्षाच्या मनुबेनच्या मनात अनेक प्रश्न उभे राहिले. पण गांधीजींच्या कशासाठी, या प्रश्नाचं उत्तर देण्याऐवजी ती रागाने एकटीच निघाली. ज्या रस्त्यावरून ते सगळे आले होते, त्या वाटेवरील पायाचे ठसे पाहात-पाहात हिंमत करत ती चालत होती. अखेर आधीच्या गावात ती येवून पोहोचली.

गांधीजी राहिले होते त्या विणकराचं घरही सापडलं. तिथे एक म्हातारी होती. मनुबेननी तिच्याकडे त्या दगडाची चौकशी केली. पण तो साधा दगड वाटून म्हातारीने तो फेकून दिला होता.

मनुबेननी त्या ठिकाणी तो दगड शोध-शोध शोधला नि तिला यश आलं. तेव्हा ती भलतीच खूष झाली.

बापूंपासून मनुबेन सकाळी साडे सहा वाजता निघाली आणि दुपारी एक वाजता पुन्हा परतली. जवळपास पंधरा मैलाचा प्रवास. तिला प्रचंड भूक लागली होती. ती रागानेच बापूंजींसमोर गेली. त्यांच्या पुढ्यात दगड टाकला आणि तिला रडू कोसळलं.

बापूजी तिच्या जवळ गेले. वाकून तिचे दोन्ही खांदे पकडले. तिची समजूत काढत ते म्हणाले : 'या दगडाच्या निमित्ताने तुझी परीक्षा झाली. या परीक्षेत तू ... यशस्वी झालीस, याचा मला आनंद आहे. हा दगड माझा पंचवीस वर्षाचा साथीदार आहे. मी जेलमध्ये असो की महालात असो तो माझ्या सोबतच होता. असे अनेक दगड मिळतील पण याबाबत जो निष्काळजीपणा झाला तो काही योग्य नाही.'

मनुबेनला हा सर्व अनुभव अंतर्मुख करणारा ठरला. गांधीजींना ती म्हणाली: 'बापू, मी रामनामाचा खरा जप मी कधी केला असेल, तर तो आज पहिल्यांदा.'

बापूजी म्हणाले : 'मला माझ्या भगिनींना निर्भय बनवायचं आहे. ही कसोटी केवळ तुझी नव्हती. तर ती माझी पण होती.'

त्या दिवशी कदाचित खरी कसोटी होती ती देवाचीच. कधी भक्तच देवाची कसोटी पाहत असतो. आणि म्हणूनच हा दिवस देवाची लाज राखणारा ठरला.

## (३७)

फिनिक्स आश्रमात आहाराबाबत लहान-मोठे सगळेजण पथ्य पाळत. जेवणाच्या वेळाही ठरलेल्या होत्या. भोजनात मसाला वर्ज्य होता. कधी तर अनेक जण मीठ वर्ज्य करून अळणी पदार्थच खायचे.

आश्रमातील एका विद्यार्थ्याला स्टेशनकडे जाताना एक शिलिंग (आफ्रिकन चलन) सापडलं. आणखी एका विद्यार्थ्याला तीन पेनींची नाणी सापडली होती. या काळात गांधीजी काही दिवसांसाठी जोहान्सबर्गला गेले होते. आश्रमातील शिक्षकांनी त्या सापडलेल्या शिलिंगचे भजी मागवले, तर पेनींच्या बदल्यात चित्रं आणून सर्व मुलांना त्याचं वाटप केलं. मात्र याची जाहीर वाच्यता कोणी केली नाही.

गांधीजी परतल्यानंतर ही गोष्ट त्यांच्या कानावर आली. याची खात्री करण्यासाठी एका शिक्षकासोबत त्यांनी याबाबत चर्चा केली. मग एका विद्यार्थ्याला घेवून घर ते छापखाना या दरम्यान फेऱ्या मारत त्याच्याकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. आणखी एका विद्यार्थ्याकडे अशीच चाचपणी केली. त्यांचा मुलगा देवदास याच्यासोबत चर्चा करण्यासाठी त्याला घेवून गेले.

काय होतंय ते कुणालाच कळत नव्हतं. त्यातच अशी बातमी आली की बापूंनी कुणाच्या तरी थोबडीत मारली. सगळ्यांना वाटलं की देवदासला  मारलं. पण तसं काही झालेलं नव्हतं. वस्तुस्थिती अशी होती की, बापूंनी स्वत:च्याच थोबाडीत मारून घेतलं, पाच वेळा. सारेच सुन्न झाले.

दुपारी बापू जेवले. मात्र संध्याकाळी त्यांनी काही खाल्लं नाही. अगदी पाणीही घेतलें नाही. संध्याकाळच्या प्रार्थनेनंतर अत्यंत वेदनापूर्वक त्यांनी आपलं म्हणणं मांडलं. ते म्हणाले : 'मला पाणीही आता कडू विषासारखं लागू लागलंय. अपत्यच जेव्हा पित्याची फसगत करतात, ती गोष्ट मनाला भयंकर यातना देणारी असते. मला हे सगळं सहन होत नसल्यानेच मी स्वत:च्या

थोबाडीत मारली. मी इतर कुणाला मारण्याऐवजी स्वत:च्याच कानशिलात लगावणं हे बरं. आता याशिवाय मी काय करावं हे मला समजत नाही.'

देवदासने आपल्या चुकीची कबूली देत पुन्हा असं वर्तन न करण्याचं आश्वासन दिलंय, याची माहितीही बापूंनी दिली. मात्र तरीही मुलं अजून सत्य लपवताहेत, प्रत्येकजण वेगवेगळं सांगतोय, असं सांगत ते म्हणाले : 'खरं बोलायची कुणाचीच तयारी नाही. असाच खोटेपणा राहिला तर पुढे जीवन अडचणीत सापडेल. आणि म्हणूनच जोवर ही मुलं सत्य सांगत नाहीत तोवर मी तोंडात अन्नाचा एक कणच नव्हे, तर पाण्याचा थेंबही घेणार नाही. सत्याच्या .... शोधात मला मरण आलं तरी बेहत्तर. आणि मी तुम्हा सगळ्यांना सांगतो की सत्याच्या आग्रहासाठी मला मरण आलं, तर तो दिवस तुम्ही साजरा करा...’

दुसऱ्या दिवशी बापूंना कामानिमित्त बाहेर जायचं होतं. रिकाम्या पोटीच ते स्टेशनकडे चालत निघाले. त्यांच्यासोबत भांबावलेल्या चेहऱ्याने इतर सगळे निघाले. स्टेशनजवळ येताच चिंतातूर झालेल्या एका शिक्षकाने पुढे येत आपली चूक कबूल केली. तणाव काहीसा हलका झाला होता.

इतक्यात ट्रेन आली. सगळे बापूंना विनवू लागले : ‘तुम्ही रुस्तुमजी शेठ यांच्याकडे पोहाचल्यानंतर तिथे जेवून मगच पुढे प्रवास करा.'

बापू ट्रेनमध्ये शिरल्यावर शांतपणे म्हणाले : 'सत्य हेच माझ्यासाठी खरं अन्न आहे.'

## (३८)

यरवडा जेलमध्ये गांधीजींवर नजर ठेवण्यासाठी तसंच त्यांची देखभाल करण्यासाठी कैदी वॉर्डरची नियुक्ती करण्यात येत असे. असाच एक आदन नावाचा कैदी मूळ सोमाली लॅन्डमधील होता. पहिल्या महायुध्दाच्या काळात ब्रिटिश लष्करातून बाहेर पडल्याच्या गुन्ह्याची शिक्षा त्याला देण्यात आली होती. त्याला दहा वर्षाचा तुरूंगवास ठोठावण्यात आला होता. एडन जेलमधून बदली करून त्याला इकडे आणण्यात आलं होतं. त्याला तुटकं-मुटकं कुराण वाचता येत होतं. पण वेळ मिळेल तसा तो तिथे 'आयत' वाचत होता. जेलमध्ये गांधीजींना भेटल्यानंतर तो त्यांचा चाहता झाला होता. त्याची सुटका करावी किंवा त्याला एडनमध्ये पाठवावं, यासाठी गांधीजी त्याला अर्ज लिहून देत असत.

एक दिवस त्याने टाइम्सचा ताजा अंक कुठूनसा मिळवला. जेलमध्ये वर्तमानपत्र दिसणं म्हणजे दुरापास्त. त्यामुळे आनंदातच तो गांधीजींजवळ गेला आणि त्याने तो अंक त्यांच्यापुढे धरला.

गांधीजी म्हणजे जेलमधील एक-एक नियमांचं काटेकोर पालन करणारे. अयोग्य नियमांच्या विरोधात, सरकारच्या विरोधात प्रसंगी प्राणांच्या बलिदानासह तयार, पण जेलमध्ये कैद्यांसाठी असलेल्या छोट्या-मोठ्या सगळ्या नियमांचं पालन करणार. आदनच्या हातातील पेपर पाहून गांधीजी म्हणाले : 'आदन, ये क्या है?'

‘महाराज, अखबार है. ताजा अखबार है. आपके लिए लाया हूं...'

‘यह अखबार मैं नहीं देख सकता. ये कानून के खिलाफ है. तुम वापस ले जाव...'

आदन यामुळे विचारात पडला. तो म्हणाला : 'सब लोग अखबार देखने मांगते है. बहुत मुश्किलसे लाया हूं.'

गांधीजींनी त्याला समजावलं : 'यह सब मैं समज सकता हूं. लेकिन ये कानून के खिलाफ है. इसलिये मैं यह नही देख सकता. तुम इसे ले जाओ और जला दो. नही तो मुझे रिपोर्ट करना होगा.'

आदन गोंधळला. तो पेपर घेवून तो निघून गेला. त्याच्या मनात मात्र विचारचक्र सुरू झालं. गांधीजींच्या एका सहकाऱ्याकडे आदन गेला आणि म्हणाला : 'महाराज कहते है कानून के खिलाफ है, पर किसका कानून? सरकार तो बदमाश है. सरकार के कानून का खयाल क्या करना? लेकिन गांधीजी मजहबी आदमी है. हमारी बात नही सुनते, आप कुछ समजाईये.'

तो साथी म्हणाला : 'गांधीजी ऐकणार नाहीत. त्यांचं मन नाराज होईल.'

आता काय करावं याचा विचार आदन करू लागला. तो पुन्हा फिरून गांधीजींच्या जवळ गेला. हलकेच गांधीजींना म्हणाला : 'आप तो बडे आदमी है, मजहबी आदमी है. आप आपके लिए अखबार नही देखनेवाले. लेकिन हमको इधर बहुत वक्त हो गया. हमारा मुल्क का कुछ अंदर हो, तो सुनाइये ना हमे?’

आदनचं ते म्हणणं ऐकून गांधीजींना हसू आलं. तो पेपर आपण वाचावा यासाठी आदनची ती युक्ती आहे हे गांधीजींच्या लक्षात आलं. पण आता त्याला अधिक नाराज करू नये, यासाठी त्यांनी त्या पेपरवर नजर टाकली. सोमालियातील युद्धाबाबत ज्या काही बातम्या होत्या, त्या गांधीजींनी आदनला सांगितल्या.

आदन तिथून नाचत बाहेर आला. लहान मुलासारखा आनंदीत होत तो सगळ्यांना सांगू लागला : ‘देखो, गांधीजीने अखबार देखा, मैंने उनको कैसे मानाया...’

प्रेमाचं बळच असं आहे की एखादा संतही नियमाला बगल देतो, किंवा प्रेमात नियमच बाजूला पडतात, असं याबाबत म्हणू शकतो.

## (३९)

गांधीजींचं आचरण हेच त्यांचं प्रवचन असायचं. एकदा गांधीजी पश्चिम बंगालमध्ये गेले होते. त्यावेळी त्यांच्याकडे एकाने संदेश मागितला. गांधीजींनी बंगाली भाषेतच त्याला संदेश दिला- 'आमार जीबोन आमार बानी'... 'माझं जीवन हाच माझा संदेश', असं त्यांनी लिहून दिलं.

आफ्रिकेतून भारतात गांधीजी परतल्यानंतर सत्याग्रह झाला आणि ते पहिल्यांदा जेलमध्ये गेले. तिथे देशातील शेतकऱ्यांप्रमाणे त्यांचा दिनक्रम होता. पहाटे चार वाजता ते उठायचे आणि दिवसभर काम करायचे. देशातील सर्वसामान्य जनता ज्याप्रमाणे दिवसभर श्रम करून मग कष्टाने मिळालेली भाजी-भाकरी खाते, त्यांच्याशी तादात्म्य साधण्यासाठी गांधीजी चार तास चरख्यावर कताई आणि दोन तास कापूस पिंजण्याचं काम, अशा पध्दतीने सहा तास श्रम करत.

जेलमध्ये गांधीजींसोबत श्री शंकरलाल बँकर यांना ठेवलं होतं. त्यांचंही वेळापत्रक गांधीजींनी बनवून दिलं होतं. शंकरलालभाई सुध्दा दोन तास कताई करायचे. शंकरभाईंची जेलमधून सुटका होण्याची वेळ आली. बापूंसोबतच्या जेलमधील त्या सहवासाने त्यांना जणू नवीन जीवन मिळालं. जेलमधून बाहेर पडण्याच्या वेळेस त्यांना या सगळ्या अनुभवाने गदगदून आलं.

त्यांची समजूत काढताना बापू म्हणाले : 'इथल्या माझ्यासोबतच्या जीवनानुभवाचा तुम्हाला लाभ झाला, ही चांगली गोष्ट आहे. मात्र बाहेर जावून इथल्या जीवनाविषयी तुम्ही लोकांना सांगा.'

'जरूर. हा अनुभव मी सविस्तरपणे लोकांना सांगेन. यातून लोकांना लाभच होईल, यात मला शंका वाटत नाही" : शंकरभाई म्हणाले.

त्यावर गांधीजी म्हणाले . 'हे सगळं ऐकल्यावर लोक काय म्हणतील ते माहित आहे ना?'

'त्याचा विचार मी केलेला नाही" : शंकरभाई

मनुष्य स्वभाव, माणसांची तऱ्हा या गोष्टींची गांधीजींना चांगलीच माहिती होती. मोठ्या माणसांचं जीवन अनुसरण्यापेक्षा त्यांना केवळ मान देणं यातच लोकांना सार्थक वाटत असतं. याच संदर्भात बापू म्हणाले : "बघा, मी सांगतो. हे सगळं ऐकल्यावर लोक म्हणतील गांधी तर महात्मा आहेत. असं जीवन तेच जगू शकतात. आपल्याला थोडीच असं जगता येईल ?'

शंकरभाईंना ते पटलं. ते म्हणाले : 'खरंय. लोक तसंच म्हणणार.'

बापू : 'मग तुम्ही याविषयी लोकांना काय सांगणार ?'

शंकरभाई : 'ते आत्ताच कसं सांगू? याबाबतचा विचार मी केलेलाच नाही.'

बापू म्हणाले : 'कोणी तुम्हाला असं म्हणालं तर तुम्ही सांगा की, मी महात्मा म्हणून जन्म घेतलेला नाही. माझ्यातही अनेक दोष होते. आणि ते दूर करण्यासाठी मी सतत काळजीपूर्वक मेहनत घेतली होती. वाणी एक-एक पैसा जमवून सावकार होतो, तसा मी एक एक सद्गुण मिळवत गेलो. यातुनच अशी परिस्थिती आली की, लोक मला महात्मा म्हणू लागले. पण खरं तर मी या उपाधीपासून अजून खूप दूर आहे. मात्र प्रत्येक माणसासाठी हा एक पर्याय आहे की, सगळ्यांनी विचारपूर्वक आणि दृढ श्रध्देने या दिशेने चालण्याचा प्रयत्न करावा. त्यातून प्रत्येकाला पुढे जाण्याचा योग्य मार्ग जरूर सापडेल, ही माझी श्रध्दा आहे.

## (४०)

वॉर्डर आदन एका हाताने अपंग होता. पण गांधीजींसोबत सुतकताई आणि पिंजकाम यात तो सक्रीय व्हायचा. या कामात तो अतिशय वाक्बगार झाला होता. त्यात तो मनापासून सक्रीय व्हायचा.

कताईचं काम काही महिने चाललं. मात्र त्यानंतर काही महिन्यांनी गांधीजींच्या डोळ्यांना त्याचा त्रास होवू लागला. डॉक्टर्सनी गांधीजींना डोळ्यांना आराम देण्याचा सल्ला दिला. मात्र तो गांधीजी ऐकतील तर ना? गांधीजींच्या या वागण्याने आदन फारच दु:खी झाला. आपल्या पद्धतीने तो गांधीजींची समजूत काढू लागला.

'काम कम कर देना चाहिए' : आदन म्हणाला.

गांधीजी म्हणाले : 'देखो, आदन यह आफताब (सूर्य) अपना काम कभी नहीं छोडता. ठीक वक्त पर निकलता हे और सारी दुनिया को रोशनी देता है. तो हम सब अपना काम क्यों छोडे?'

आदन यावर काय बोलणार ? गप्प झाला. गांधीजींच्या प्रकृतीविषयी तो फार चिंतेत होता. काही दिवसांनी गांधीजींची प्रकृती आणखी ढासळली. त्यांनी अन्नही कमी केलं. भाकरीचे चार तुकडे ते दिवसभरात खायचे. नंतर दिवसभरात दोन तुकडे दे, असं त्यांनी आदनला सांगितलं. आदनची चिंता अधिकच वाढली.

गांधीजींच्या जवळ जात हळूच तो म्हणाला : 'महाराज, आफताब तो कानून को छोडता नही है, तो आप रोटी कैसे कम कर सकते है ?'

आदनच्या या युक्तीवादावर गांधीजींना हसू आलं.

आदनविषयी गांधीजींनी लिहिलय - आदनचं हे प्रेम माझ्या आयुष्यातील सगळ्यात बहुमूल्य संस्मरणातील एक आहे.

## (४१)

दक्षिण आफ्रिकेतून आल्यानंतर गांधीजी आपल्या काही सहकाऱ्यांसह रेल्वेने प्रवास करत होते. ते सगळे तिसऱ्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करत होते. त्या डब्यातील अस्वच्छता पाहून इथे साफसफाई करण्याचा प्रस्ताव गांधीजींनी सहकाऱ्यांसमोर ठेवला. पण डब्यातील पाण्याची टाकी रिकामी होती. या मंडळींकडे एक लोटा पाणी होतं तेवढंच.

मग गांधीजींनी एक वर्तमानपत्र घेतलं आणि म्हणाले : 'या पेपरच्या मदतीने एक लोटा पाण्याने डब्याच्या किमान खिडक्या कसं साफ करु शकतो, हे मी तुम्हाला दाखवतो. आणि गांधीजी स्वत:च शौचालयाच्या साफसफाईला लागले.'

स्वच्छतेबाबतच्या या कृतीतून गांधीजींनी आपल्या सहकाऱ्यांना एक वस्तूपाठ घालून दिला.

## (४२)

येरवडा जेलमध्ये गांधीजींचे कपडे त्यांचे साथी शंकरलालभाई धूत असत. एक दिवस गांधीजी त्यांना हळूच म्हणाले : 'माझे कपडे असेच राहू द्या, मीच ते धुवेन.' आपण कपडे धुतो त्यात काही उणीव राहतेय का, असं शंकरलालभाईंनी गांधीजींना विचारलं.

त्यांची समजूत काढत गांधीजी म्हणाले : ‘तुम्ही कपडे चांगलेच धुता. पण मला वाटतं माझ्यासाठी साबण जरा जास्तच वापरला जातोय. तो साबण मी आणखीन काही दिवस पुरवून वापरू शकतो.

'आता मी काटकसरीने साबण वापरेन’: शंकरभाई म्हणाले. साबण थोडा वापरला तरी कपडे स्वच्छ होतात, हे शंकरलालभाईंच्या लक्षात आलं. काटकसरीतील नवी दृष्टी त्यांना आली.

काटकसरीच्या अवलंबनामागे एक कल्पनाशक्ती काम करत असते. ती प्रक्रिया महत्वाची ठरते.

एका सकाळी गांधीजी म्हणाले : ‘शंकरलाल आज शेगडी पेटवू नका. आज पाणी गरम कारायचं नाही.’

‘का?’ : शंकरलालभाईंनी विचारलं.

रात्री शेगडीत निखारे धुमसत होते. मी विचार केला की, त्यावर पाण्याचं टमरेल ठेवावं. सकाळी ते पाणी गरम झालं आणि माझा प्रयोग सफल झाला. मला पिण्यासाठी गरम पाणी मिळालं.

शंकरभाई मात्र विचारात पडले. त्यांच्या मनात काही प्रश्न उभे राहिले. मला सकाळी लवकर उठून शेगडी लावण्याचे श्रम पडतात, म्हणून तर बापूंनी हे केलं नाही ना? मी त्यांचं समाधान करु शकत नाही का? माझ्या कामात काही त्रुटी राहताहेत का?

गांधीजी म्हणाले : ‘तुमच्या कामात काही कसूर नाही. पण मी हा एक प्रयोग केला. चुलीतील निखाऱ्यांची नाहीतरी धुमसत राख होणार. म्हणूनच या धुमसत्या निखाऱ्यांवर मी पाणी गरम केलं. यामुळे कोळसा वाचला. याविषयी वेगळा विचार करत तुम्ही मनाला काही लावून घेण्याची गरज नाही.’

## (४३)

येरवडा जेलमध्ये गांधीजींनी शंकरभाईंना विचारलं: ‘तुम्ही गीत वाचली आहे?'

शंकरलालभाईंनी विद्यार्थीदशेत असताना गीता वाचली होती. मात्र आता त्यांना ते नीट आठवत नव्हतं.

गांधीजींनी दुसरा प्रश्न केला : ‘संस्कृतमध्ये वाचली आहे ?'

शंकरभाई उत्तरले : ‘नाही. माझी दुसरी भाषा फ्रेंच होती. संस्कृत मला येत नाही.’

‘गीता तर संस्कृतमध्येच वाचायला हवी. गीता समजण्याइतपत संस्कृत तुम्हाला नक्कीच शिकता येईल.’ : गांधीजी म्हणाले.

'आता या वयात संस्कृत शिकणं कठीणच’: शंकरलाल म्हणाले.

‘यात काहीच कठीण नाही, मी तुम्हाला संस्कृत शिकवेन.': गांधीजी ठामपणे म्हणाले. गांधीजींनी भाषा शिकवायला आवडत असे. आफ्रिकेत असताना त्यांना एका ड्रायव्हरला इंग्रजी शिकायला बजावलं. त्यामुळे त्याला अधिक पगार मिळेल, असं सांगत त्यांनी त्याला शिकवायलाही सुरुवात केली होती.

जेलमध्ये भांडारकरांची मार्गोपदेशिका मागवण्यात आली. मग त्याआधारे भाषा शिक्षणाचा रितसर अभ्यास सुरू झाला. रोज एक तास यासाठी देवून सर्व धडे पूर्ण करण्यात आले. ‘गीता वाचण्यासाठी एवढं खूप झालं.’ : गांधीजी शेवटी म्हणाले.

मग गीता वाचनाला सुरूवात झाली. वाचन करताना ऱ्हस्व – दीर्घ उच्चारांबाबत बापू काटेकोर लक्ष देत. काही दिवसांतच गीतेचं वाचन पूर्ण झालं. बापू म्हणाले : ‘आता रोज एक अध्याय पाठ करा...’

‘हे कशासाठी ? तुमच्यासोबत तर संपूर्ण गीता वाचून ती समजावून घेतलीय. आता रोज नवा पाठ कशाकरता ?' : आधुनिक विचारसरणीच्या शंकरलालभाईंनी विचारलं.

गांधीजी म्हणाले : ‘हा एक असा ग्रंथ आहे ज्याचं रोज अध्ययन करणं गरजेचं आहे. त्यातून तुम्हाला रोज नव्या सत्याचा शोध लागेल.’

शंकरलालभाईंच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह कायम होतं.

ते पाहून गांधीजी म्हणाले : ‘तुम्हाला किती मित्र आहेत ?'

'मित्र? खूप आहेत’ : शंकरलालभाई.

‘तसं नाही, यापैकी संकटकाळी तुमच्या मदतीला धावून येतील असे किती आहेत ?' बापूंनी प्रश्न केला.

आता शंकरलालभाई विचारात गढले. मात्र त्यांनी प्रांजळपणे सांगितलं : 'तसा तर कुणी मित्र नाही. म्हणजे यापैकी काही मदतीला धावून येतीलही, पण सांगता येत नाही. आजकालच्या जमान्यात मित्रांबाबत काहीही खात्री देता येत नाही.’

गांधीजींना जे अपेक्षित होतं तेच शंकरलालभाईंनी बरोबर सांगितलं. सगळ्यांनाच त्यातून योग्य तो बोध झाला. त्यावर गांधीजी म्हणाले : ‘पुस्तकं खूप आहेत. खूप पुस्तकं वाचूनही त्यापैकी संकटकाळी किती उपयोगी येतात? अडचणीच्या काळात एकच पुस्तक कामी येतं ते म्हणजे गीता.'

## (४४)

येरवडा जेलमध्ये एक दिवस सकाळी गांधीजी आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले : 'काल रात्री उशीरापर्यंत मी झोपूच शकलो नाही.'

'का ?' : सगळेच म्हणाले.

काल रात्री नेहमीप्रमाणे मला झोप लागली. पण थोड्याच वेळात मागच्या जाळीतून काही आवाज होवू लागल्याने माझी झोपमोड झाली. जावून पाहिलं तर तिथे सापासारखं तोंड दिसत होतं... गांधीजींनी आपला रात्रीचा अनुभव सांगितला.

सारेच अचंबित होवून म्हणाले : 'मग तुमच्या बरॅकबाहेर जो वार्डर झोपतो त्याला उठवायचं ना?'

'ते मला कळत नाही काय?' गांधीजी म्हणाले : 'मी त्याला उठवलं असतं तर त्याने आणखी इतरांना बोलावलं असतं. त्या सगळ्यांनी मिळून मग त्या सापाला ठार मारलं असतं. म्हणूनच साप आत आला आणि चावला तरी वार्डरला उठवायचं नाही हे मी ठरवलं होतं... पण नंतर मनात विचार आला की तो आत येवून मला चावल्यास माझं जे काय व्हायचं ते हेईल, पण तो विषारी असेल आणि बाहेर जाताना झोपलेल्या वॉर्डरला चावला तर त्याचाही जीव जाईल. अशा परिस्थितीत माझं धर्मकर्तव्य काय, असा प्रश्न पडला. जर वार्डरला उठवत नाही तर त्याचा जीव धोक्यात येतो, आणि त्याला उठवलं तर सापाला मारल्याशिवाय तो रहाणार नाही...'

'मग शेवटी झालं काय ?' : सगळ्यांनीच गलका केला.

सगळ्यांकडे पाहात गांधीजी म्हणाले : 'मनात हा सगळा गोंधळ सुरू असतानाच चंद्र हळूहळू वर आला. चंद्रप्रकाश मागच्या जाळीवर पडला. मी डोकावून पाहिलं तर तिथे सापाचं डोकं काही दिसत नव्हतं. पण तिथे एक सरडा होता. साप नाही म्हटल्यावर मग मी झोपलो...'

या अनुभवाने सगळेच सुन्न झाले. सापासारख्या विषारी प्राण्याला ठार मारायचं नाही तर काय ? हाच प्रश्न प्रत्येकाच्या मनात उभा राहिला होता.

याबाबत मग गांधीजींनी श्रीमद् राजचंद्राने जे सांगितलंय त्याचाच दाखला दिला. श्रीमद् म्हणालेत की, ज्या विधात्याने आपल्याला जीव दिलाय त्यानेच  त्या प्राण्यांचीही निर्मिती केली आहे. त्यामुळे खरं अहिंसेचं सार हेच आहे की, आपण जगायचं आहेच पण दुसऱ्या प्राण्यांचा जीव घेवून नव्हे.

## (४५)

जर्मनीतील उद्योजक कॅलनबेक गांधीजींच्या जीवनाशैलीने प्रभावित झाले आणि त्यांचे सहकारी झाले. गांधोजी दुसऱ्यांदा जेलमध्ये गेले होते. त्यांची सुटका झाली, तेव्हा त्यांना घ्यायला कॅलनबेक जेलमध्ये गेले होते. आपली नवी मोटार घेवून ते जेलच्या दरवाजापाशी गांधीजींची वाट पाहात होते.

गांधीजी जेलमधून बाहेर आले. ते सगळ्यांना भेटले. कॅलन बेकने त्यांना आपल्या मोटारीत बसण्याची विनंती केली.

'ही कोणीची मोटार आहे.?' : गांधीजींनी विचारलं.

'माझी आहे. आताच खरेदी केली आणि थेट इथेच आलोय...', कॅलनबेक.

'कशासाठी खरेदी केली ?'

आता कॅलनबेकचा उत्साह थोडा मावळला. संकोचत ते म्हणाले : 'तुम्हाला घेवून जाण्यासाठी.'

'आत्ताच्या आत्ता तू या गाडीचा लिलाव करून ये. माझ्यासाठी तुझ्या मनात हा मोह का आला? मी यात बसणार नाही. तू ही गाडी विकून पुन्हा इथे ये. मी तोवर तुझी इथेच वाट पाहतो...' : गांधीजींनी आपल्या या मित्राला फर्मानच सोडलं.

कॅलनबेक त्या सरशी गेले आणि गाडी विकून पुन्हा माघारी आले. तोवर गांधीजी त्यांना घ्यायला आलेल्या इतर सहकाऱ्यांसह तिथेच थांबून राहिले. त्यानंतर ते सगळे आपल्या मुक्कामी पायी चालत रवाना झाले.

## (४६)

खादीकामाकरता पैसे गोळा करण्यासाठी गांधीजी ओरिसाचा दौरा करत होते.

एका सभेत ते व्यासपीठावर बसले होते. तिथे एक अत्यंत वयोवृध्द बाई आली. केस पांढरे झालेले, पाठीत वाकलेली अशा त्या बाईला गांधीजींना भेटायचं होतं. स्वयंसेवकांच्या मदतीने ती गांधीजींपर्यंत पोहोचली.

तुमचं दर्शन घ्यायचं आहे, असं म्हणत तिने गांधीजींच्या पायाला थरथरता हात लावला. तिथे आपल्या ओच्यातून अर्धेली (अर्धा पैसा) काढली आणि गांधीजींच्या पायाजवळ ठेवली. त्यानंतर आली तशी शांतपणे निघून गेली.

गांधीजींनी ती अर्धेली उचलली आणि आपल्या कमरेला धोतराच्या ओटीत खोचली.

सगळा हिशेब सांभाळणारे जमनालाल बजाज गांधीजींच्या बाजूला बसले होते. ते गांधीजींना म्हणाले : ‘ती अर्धेली माझ्याकडे द्या.'

गांधीजी म्हणाले : 'मी ती तुम्हाला देवू शकत नाही.'

जमनालाल : 'चरखा संघाला मिळालेले हजारो रूपयांचे चेक माझ्याकडे दिले जातात, मग या अर्धेलीबाबत माझ्यावर विश्वास नाही ?'

गांधीजी : 'ही अर्धेली हजारो रूपयांपेक्षा किमती आहे. माणसाकडे लाखो रूपये असल्यानंतर त्याने हजार रूपये देणं ही काही मोठी गोष्ट नाही. पण वृध्द, गरीब, फाटक्या महिलेने अर्धेली देणं म्हणजे तिच्या मनात उदारता किती विशाल आहे, हे बघा. म्हणूनच ही अर्धेली मला कोट्यावधी रूपयांपेक्षा अधिक किमतीची वाटते.'

## (४७)

फिनिक्स आश्रमापासून साधारण अकरा मैल अंतरावार वेरुलम येथे हिंदी भाषिकांनी लक्ष्मीनारायणाचं मंदिर उभारलं होतं. त्याच्या उद्घाटनासाठी गांधीजींना आमंत्रित करण्यात आलं होतं. प्रेमाखातर गांधीजींनी हे आमंत्रण स्वीकारलं.

निमंत्रण द्यायला येणाऱ्याने आश्रमातील सगळ्यांनी या कार्यक्रमाला यावं, असा आग्रह केला होता. त्यासाठी सगळ्यांना रेल्वेभाडं देण्याचं वचनही त्यांने दिलं होतं. त्यांच्या संस्थेकडे तेवढी आर्थिक ताकद असल्याची हमीही दिली.

गांधीजींची रीतच न्यारी. ते हसत त्याला म्हणाले : 'तुम्ही आम्हा सगळ्यांना रेल्वेभाडं देणार ते ठीक आहे. पण मी तुम्हाला सांगू इच्छितो की, आम्ही रेल्वेभाडं घेवू पण येणार मात्र चालत. भाड्याची रक्कम संस्थेच्या खात्यावर जमा होईल.'

वेरूलम स्टेशनवर गांधीजींच्या स्वागतासाठी तयारी करण्यात आल्याने एक स्टेशन आधीच गांधीजी गाडीत चढले आणि तेवढाच काय तो एक स्टेशनाचा प्रवास करण्याची योजना आखली गेली होती.

मंदिराचं रितसर उद्घाटन झालं. लोकांच्या उत्साह आणि आनंदला पारावार उरला नव्हता. पण ते मंदिर लक्ष्मीनारायणचं होतं. त्या कार्यक्रमात गांधीजींना चांदीचं टाळं-चावी देण्यात आलं होतं. त्यासोबतच सोन्याचं वर्ख असलेलं गीतेचं पुस्तकही देण्यात आलं.

या सर्व पार्श्वभूमीवर बोलताना गांधीजींनी मग आपल्या मनातील भावना खुलेपणाने मांडल्या. ते म्हणाले : 'तुम्ही मला चांदीचं टाळं-चावी तसंच सोन्यानं मढलेली गीता दिलीत आणि मला चिंतेत टाकलं आहे. मी हे सगळं कोठे ठेवू? हे तर मढ्याला हिऱ्याने सजवण्यासारखं आहे. गीता ही तर स्वतंत्रपणे झगमगणारं रत्न आहे. सोन्यासारख्या जड धातूने याची शोभा काय वाढणार? आता ही गीता मी माझ्याजवळ ठेवू शकत नाही. कारण कोणी चोरणार तर नाही ना

या विवंचनेत मला जगावं लागेल. गीता तर मोह-मायापासून दूर जाण्याची शिकवण देते. आणि तुम्ही मला तर आसक्तीत टाकताय.'

या चांदी-सोन्याऐवजी त्याची रक्कम आश्रमाच्या खात्यात जमा करा, असं गांधीजींनी सांगितलं. त्यानंतर ते तिथून निगाले.

# (४८)

१९२२ साली गांधीजींना यरवडा जेलमध्ये ठेवण्यात आलं होतं. तिथे गांधीजींना ज्या ठिकाणी ठेवण्यात आलं होतं, त्या जागेची उंची कमी होती.  त्यामुळे तिथे कोंदट वातावरण होतं. ही बाब जेलचे अधीक्षक मेजर जोन्स यांच्या निदर्शनास आली. त्यानंतर त्याने गांधीजींची जागा बदलली आणि युरोपीय कैद्यांना जिथे ठेवण्यात येत होतं त्या बराकीजवळ नेलं. या जागेचा तळ उंच होता. त्याला ओसरी होती. कंपाऊन्डमध्ये फुलझाडं होती. मेजर जोन्सनी गांधीजींची नीट काळजी घेतली होती. गांधीजींनाही ती जागा आवडली होती. त्यांची अनुमती येताच तिथे बदली करण्यात आली.

संध्याकाळी गांधीजी त्यांचे सहकारी शंकरलाल बँकरना म्हणाले : ‘आपण आपल्या जुन्या जागेत जावूया. आपण इथे आलो हे योग्य केलं नाही. कैद्यांना कुठे ठेवायचं याचा अधिकार जेल अधीक्षकांना असतो, पण माझ्यासाठी तो असू शकत नाही. मला कुठे ठेवायचं याचा निर्णय सरकारनेच घेतला असेल. हा निर्णय अधीक्षक फिरवत आहेत, ही त्याची चूक आहे. जर सरकारच्या हे लक्षात आलं तर त्याची किंमत त्याला मोजावी लागेल. त्याला वाचवावा हा मला माझा धर्म वाटतो.

मग ही गोष्ट अधीक्षक जोन्स यांच्यापुढे मांडण्यात आली. त्याने लगेच त्यावर आपली प्रतिक्रिया नोंदवली : ‘मी इथला अधीक्षक आहे. मला इथले पूर्ण अधिकार आहेत. सरकारला जर माझं काम पसंत नसेल आणि माझ्या कामात हस्तक्षेप केला तर मी तडक राजीनामा देईन.'

गांधीजी : ‘तुम्ही म्हणताय तशी इथे तुमची सत्ता असेल खरी. पण ती सर्वसामान्य कैद्यांसाठी आहे. माझ्यासाठी नाही. आम्हाला आमच्या जुन्या जागेतच जाऊ द्या.’

दोन्ही बाजूंनी दोघेजण ठाम होते. शेवटी गांधीजी म्हणाले : 'तुम्ही आमच्यासाठी जे करताय त्याची मला जाणीव आहे, तुमच्या आपलेपणाची मी कदरही करतो. पण आमच्याबाबत सरकारचं काय धोरण आहे ते जाणून घेणं मला महत्त्वाचं वाटतं. म्हणूनच तुम्ही आम्हाला आमच्या

आधीच्या जागी न्या   आणि नंतर तुमच्या गृहमंत्र्याशी बोला. जर आमची शंका दूर झाली तर आम्हाला पुन्हा इथे आणा.'

गांधीजींचा हा प्रस्ताव मेजर जोन्सच्या पचनी पडला. त्याने गांधीजींना जुन्या जागेत नेलं. तीन-चार दिवसांनी मेजर जोन्स पुन्हा गांधीजींजवळ आले. गांधीजींनी जी दूरदृष्टी दाखवून आपली काळजी घेतली याबद्दल तो त्यांचे आभार मानू लागला.

तुमचं म्हणणं खरं आहे. तुम्हाला इथेच ठेवायचं असा सरकारचा ठाम निर्णय आहे. सरकारच्या आदेशाविना मी तुम्हाला दुसरीकडे ठेवलं असतं तर मी अडचणीत आलो असतो. मीही तसा हट्टीच आहे. सरकारने जर माझ्याविरूध्द काही केलं असतं तर मी राजीनामा देवून मोकळा झालो असतो. तुम्ही योग्य सल्ला दिलात याबद्दल तुमचे शतश: आभार...

मेजर जोन्सला आपली चूक उमगली होती.

## (४९)

खान अब्दुल गफ्फारखान १९३४ साली जेलमधून सुटले. त्यांना आराम करण्यासाठी बापूंनी आपल्याकडे वर्धा येथे बोलावलं. ते तिथे आले आणि जमनलालजी यांच्याकडे राहिले. त्यांच्यासोबत त्यांची मुलंही होती. प्रार्थनेच्या वेळेस सगळे बापूंकडे जायचे.

बापूंचा जन्मदिवस होता. बापूंनी सगळ्यांना जेवायला थांबवलं. भोजनानंतर खानसाहेबांचा मुलगा गनी हा बापूंजवळ गेला. तो त्यांना म्हणाला: 'आज इथे येताना मला खूप आनंद झाला होता. आज बापूंचा जन्मदिन, त्यामुळे मला वाटलं की आज इथे पुलाव, मुर्गी वगैरे खाण्याची मेजवानी असेल. पण पाहा ना, आजही रोजच्यासारखा भोपळाच निघाला. त्यातल्या त्यात चांगलं म्हणजे तो किमान उकडून मिळाला.’

ते ऐकून गांधीजी खळखळून हसले. मग खानसाहेबांच्या खांद्यावर हात ठेवत बापू म्हणाले : 'हे पाहा, हा लहान मुलगा आहे. याला जे पाहिजे ते तुम्ही द्या. त्याच्यासाठी तुम्ही मांस, अंड वा त्याला हवं ते शिजवून द्या...'

त्यावर खानसाहेब म्हणाले : 'बापू, अहो तो तुमची गंमत करतोय. आम्ही जिथे जातो तिथला यजमान जे खातो, तेच आम्ही खातो. तुम्ही त्याला काही वेगळं द्याल तर ते तो घेणारही नाही.' खानसाहेब खाणार नसतील, तर दुसरं काही खायला त्यांची मुलंही तयार नव्हती.

## (५०)

देशाच्या फाळणीनंतर जी दंगल उसळली त्यावेळी गांधीजी खान अब्दुल गफ्फारखान यांच्यासोबत बिहारच्या गावांतून प्रवास करत होते. असंख्य निराश्रीत मुस्लिम बापूंजवळ यायचे. आपली गाऱ्हाणी मांडायचे : 'बापू आम्ही काय करायचं? इथे चारी दिशांना हिंसेचा डोंब उसळलाय, मारहाण, कत्तली होतायत. कुठेच काही सुरक्षित नाही...'

गांधीजी म्हणायचे : 'मी तुम्हाला बहादुरी शिकवायला आलोय. पण तुम्ही तुमच्या घरी पुन्हा परतायला हवं.'

हे ऐकून सारेच हबकले : 'तुम्ही हे आम्हाला काय सांगताय ? तिथे गेल्यावर आमची कत्तल होणार नाही याची शाश्वती काय?'

गांधीजी ठामपणे म्हणाले : 'मी तुम्हाला कसली गॅरेंटी देवू शकतो ? हो, पण तुमच्यापैकी कुणाच्याही जीविताला धोका झाला तर समस्त हिंदू या गांधीचा जीव गमावून बसतील, एवढी खात्री मी तुम्हाला देवू शकतो.'

गांधीजींच्या या उद्गाराने मात्र साऱ्यांचीच हिंमत बळावली. मग सगळे आपापल्या घराकडे परतू लागले.

संध्याकाळच्या प्रार्थनासभेत गांधीजी म्हणाले : 'या भागातील मुस्लिम बांधवांना मी वचन दिलंय की, त्यांच्यापैकी कुणाच्याही जीवाला धोका झाला, तर बिहारमधील हिंदुजनांना त्याची किंमत गांधीच्या जीवाने चुकवावी लागेल.'

गांधीजींच्या मुखातून येणारा प्रत्येक शब्द ऐकणाऱ्याच्या काळजावर कोरला जात होता. गांधीजी ठामपणे बोलत होते, पण त्यांच्यातील सहृदयता, करूणा याने ऐकणारे सद्गदीत झाले होते. त्यामुळे मनातील वैरभाव गळून विश्वबंधुतेचे भाव रूजायला मदत होत होती.

## (५१)

आफ्रिकेहून आलेले गांधीजी अहमदाबादमधील त्यांचा मित्र बॅरिस्टर जीवनलाल यांच्याकडे उतरले होते. अहमदाबादेतच आश्रम सुरू करण्याचा विचार त्यांच्या मनात घोळत होता. स्वातंत्र्य आणि सेवा यांच्या लढ्याचं स्वरूप तेव्हा त्यांच्यापुढे स्पष्ट झालेलं नव्हतं.

एक दिवशी जीवनलाल घरात हसत हसत आले आणि गांधीजींना म्हणाले: 'गांधी, तुमची किर्ती तर चारी दिशांना पसरते आहे.'

मग त्यांनी आपल्याला आलेला अनुभव सविस्तर सांगितला. जीवनलाल म्हणाले : 'आज माझा एक वकील मित्र भेटला. आम्ही पोलीस पुलावरून  चालत निघालो होतो. आमच्या पुढे दोन माणसं एकमेदांशी बोलत चालली होती. त्यात आपला स्वयंपाकी होता. तो आपल्या भाऊ-बांधवांना सांगत होता की, आमच्याकडे एकजण आफ्रिकेहून आलाय. त्याला नाश्त्यात दहा-बारा केळी खायला हवीत. दिवसभर घरी बसून असतो. म्हणतो की तो बॅरिस्तर आहे, पण काम काही करत नाही...'

'पाहिलंस ना गांधी, आम्ही तुझी कशी बदनामी करतोय...', असं म्हणत तो मित्र जोराने हसू लागला. गांधीजीही त्याच्यासोबत हसू लागले.

मात्र नंतर गंभीर होत गांधीजी म्हणाले – 'तसं पाहिलं, तर त्याचं खरंच आहे. मी अजून काहीच काम करत नाही. पण दिवसातील क्षण-न-क्षण मी काय करतोय, माहित आहे? ज्या पध्दतीने कुणी सेनापती दुश्मनाच्या किल्ल्यासमोर उभा राहून इथे भगदाड कसं पाडता येईल, आपलं सैन्य आत कसं घुसवता येईल याचा विचार करत असतो तसाच विचार मी करतो आहे. या ब्रिटिश साम्राज्याला कशा पध्दतीने खिंडार पाडू ? याचंच चिंतन मी सतत करीत असतो...'

काळ पुढे गेला. गांधीजींचं चिंतन प्रत्यक्षात उतरलं. पोलीस पुलाजवळ असलेल्या बॅरिस्टर जीवनलाल यांच्याच त्या घरात पुढे गांधीजींनी आश्रम सुरू केला...

## (५२)

कर्मवीर गांधीजींनी आफ्रिकेतून आल्यानंतर अहमदाबादमध्ये कोचरबला आश्रम सुरु केला. देशसेवेचं नवं व्रत सुरु झालं.

शहरातील एक वकील काही काम मिळावं, या हेतूने आश्रमात गांधीजींना भेटायला गेला. त्यावेळी गांधीजी स्वयंपाकघरात अन्न-धान्य साफ करण्याच्या कामात गुंतले होते. ते बाहेर आले. त्यांनी त्या वकिलाचं स्वागत केलं, त्यांना बसायला पथारी टाकली आणि म्हणाले – 'बसा!'

वकील कोट-टाय बांधूनच आले होते. न बसता उभ्या-उभ्याच ते म्हणाले: 'मी काही इथे बसायला आलेलो नाही. मला काम हवं आहे. तुम्ही माझ्यालायक काही काम मला द्याल, या आशेने मी आश्रमात आलो आहे.'

गांधीजी म्हणाले : 'छान, आनंदाची गोष्ट आहे.'

त्यांनी बाजूलाच असलेली धान्याची पिशवी पुढे ओढली : 'यात छोटे खडे आहेत, ते नीट काढून हे धान्य साफ करा.'

वकील या प्रकाराने अवाक् झाले. धान्य साफ करायचं? हे काम तर नोकर किंवा बायकांचं ही त्यांची धारणा. कपाळावर आठ्या आणत ते म्हणाले: 'हे धान्य साफ करण्याचं काम मी करायचं आहे?'

गांधीजी म्हणाले : 'हो. आता तरी माझ्याकडे हेच काम आहे.'

वकीलाची बुध्दी कार्यरत झाली. त्यांच्या लक्षात आलं की, गांधीजी हे काही साधंसुधं व्यक्तिमत्त्व नाही. लहान-मोठं काम यात त्यांना भेद वाटत नाही. याच्याच पुढे जावून देशवासियांत लहान-मोठा असा कोणताही भेद न करता ते सगळ्यांच्या मदतीकरता सज्ज असतात, हेही वकील महाशयांच्या लक्षात आलं.

गांधीजींच्या सोबतीने ते धान्यातील खडे काढायला बसले. एक-एक खडा काढता काढता नवी प्रेरणा मिळत गेली आणि त्यांचं जीवनही समृद्ध झालं.

## (५३)

साबरमती आश्रमात तिथल्या एकूण कामाविषयी महासभा सुरू होती.

अचानक आश्रमातील एकजण धावत-धावत आला. तो जोरजोरात ओरडू लागला : मेलो, मेलो, माझ्या पोटात काहीतरी होतयं...'

बापू त्या बैठकीतून लगेच उठून उभे राहिले आणि त्या माणसाच्या जवळ गेले. त्याला बाजूला नेण्यात आलं. तिथे त्याला नेमकं काय झालंय, ते समजून घेत त्याच्यावर आपल्या पध्दतीने उपचार सुरू केले. पुढे काय करायचं याच्या सूचना गांधीजींनी दिल्या. त्याची नीट काळजी घेतली जाईल, याची खात्री करूनच मग ते पुन्हा महासभेसाठी परतले. त्या बैठकीत इतर अनेक मान्यवर आणि मोठे नेते गांधीजींची वाट पाहात होते.

गांधीजी परत जात असताना तिथल्या कुणीतरी हसतच म्हटलं : 'या वेड्यासाठी एवढा वेळ घालवून बापू त्याचे उगाच लाड करताहेत.'

बापूंनी ते एकून शांतपणे म्हणाले : 'वेड्यांशिवाय माझ्याकडे दुसरं कोण येणार? तो माझ्याकडे आला याचा अर्थ तो माझ्या कुटुंबातील आहे, माझ्या कुटुंबातील अशा लोकांचाच माझ्यावर पहिला हक्क ठरतो ना ?'

# (५४)

गांधीजी वेळेबाबत अतिशय काटेकोर होते. गोध्रा राजकीय परिषदेत टिळकांना यायला अर्धा तास उशीर झाला. त्यावेळी गांधीजी म्हणाले : ‘स्वराज्य अर्धा तास उशीराने येईल...’

वेळ पाळण्याबाबत ते फारच जागरूक असत. चंपारणमध्ये कोर्टात त्यांच्यावर एक केस सुरू होती. अकरा वाजताची वेळ देण्यात आली होती. तिथे जाण्यासाठी घोडागाडीची व्यवस्था करायची होती. ती गाडी साडेदहा वाजता बोलावण्यात आली होती.

याबाबत गांधीजींना एक सहकारी म्हणाला : 'घोडागाडीसाठी हा अर्ध्या तासाचा रस्ता नाही. एवढ्या लवकर ही गाडी का बोलावली ?'

गांधीजी म्हणाले : 'ती गाडी जर साडेदहा वाजता इथे आली नाही तर ? मी चालत कोर्टात जाऊ शकतो एवढा वेळ माझ्या हातात असायला हवा. म्हणून लवकर मागवली.’

कोणत्याही अडचणीमुळे दिलेली वेळ पाळण्यात अडथळा येवू नये, याकडे गांधीजींचा कटाक्ष असायचा. याबाबत कोणतीही बेदरकारी त्यांना खपत नसे. त्यासाठी थेट चालत जाण्यावर त्यांचा विश्वास असायचा.

## (५५)

अहमदाबादच्या प्रेमाबाई हॉलमध्ये गुजराती साहित्य परिषदेत गांधीजींना प्रेमुख पाहुणे म्हणून बोलावण्यात आलं होतं. हॉल खचाकच भरला होता. गांधीजींनी भाषण सुरू केलं. तेवढ्यात लोक ओरडू लागले - 'माईक माईक.'

गांधीजी म्हणाले : 'शांतता पाळा. शांत व्हा मग ऐकायला येईल. ऐकायला येतंय ना?'

समोरच्या भिंतीजवळ उभा असलेला एकजण म्हणाला : 'नाही, ऐकायला येत नाही...'

'अरे, मग हे कसं ऐकायला आलं?' गांधीजींच्या या प्रश्नावर सर्व सभा खो खो हसायला लागली.

मग सगळे शांत झाले आणि प्रसन्नपणे गांधीजींनी आपले विचार मांडले...

## (५६)

स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधी गांधीजी वायव्य सरहद्द प्रांतात गेले होते. तिथे ' ‘सरहद्द गांधी’ म्हणून लोकप्रिय असलेले खुदाई खिदमतगार चळवळीचे प्रणेते खान अब्दुल गफ्फारखान हे यजमान होते.

रात्री गांधीजींची ज्या ठिकाणी झोपण्याची सोय केळी होती, त्या ठिकाणाच्या जवळ सशस्त्र रक्षकाची व्यवस्था केली होती. हे केवळ संरक्षणात्मक पाऊल होते. ते पाहून गांधीजींनी गफ्फारखान यांना विचारलं : 'हे काय आहे?'

‘बापू इथे कोणी आगंतुक घुसू नये, तुम्हाला कोणी सतावू नये, एवढयाचसाठी त्यांना इथे ठेवलं गेलं आहे' : गफ्फारखान म्हणाले.

पण त्याने गांधीजींचं समाधान कसं होणार ? ते म्हणाले : 'हे रक्षक मला नकोत.’

त्यावर फार चर्चा तशी होणारच नव्हती. त्या रक्षकांकडची सगळी हत्यारं काढून घेण्यात आली, त्यानंतरच गांधीजी झोपायला गेले.

पठाणांच्या त्या प्रदेशात ही गोष्ट वाऱ्यासारखी पसरली. लोक म्हणू लागले: 'पाहा तर, हा माणूस, अजबच म्हणावा लागेल. खुदावर याला एवढा विश्वास आहे की शस्त्रांची त्याला गरजच लागत नाही...'

## (५७)

१९४७ साली उन्हाच्या कडाक्यात बिहारमध्ये धार्मिक दंगली भडकल्या होत्या. तिथला दौरा करून गांधीजी दिल्लीत आले. त्या दिवसांत त्यांचं खाणं कमी झालं होतं.

एक दिवस सकाळी गांधीजी जेवत असताना आंब्याचा रस असलेला ग्लास मनुबेननी गांधीजींच्या जवळ ठेवला. बापूंनी विचारलं : पण मला माहिती घेवून सांग की, या आंब्याच्या एका नगाची किंमत किती ?

मनुबेनला वाटलं गांधीजी आपली थट्टा करताहेत. ती तिच्या लिखाणाच्या कामात गुंतून राहिली.

मात्र बापूंनी तो रस घेतला नाही, हे लक्षात येताच मनुबेननी त्यांना तो प्यायला सांगितलं.

'तू या आंब्याची किंमत विचारूनच आली असशील ना?' - बापू म्हणाले.

ते पुढे म्हणाले : 'हा आंबा कोणी भेट दिली असेल तरी त्याची किंमत किती ते विचारूनच मला ते द्यायला पाहिजे. मी विचारल्यानंतरही तू मला उत्तर दिलं नाहीस. या एका आंब्याची किंमत दहा आणे आहे अशी माझी माहिती आहे. पण हे फळ न खाताही मी जगू शकतो. मुळात या फळाने माझ्या शरीरातील लोह काही वाढणार नाही. उलट ते कमी होईल. त्यामुळे मला पुढे किती व्याधी होईल याचा विचार कर. तू चार आंब्याचा हा रस भरलेला ग्लास मला दिलास. त्याची किंमत अडीच रूपये झाली. एवढं महाग मी कसं खायचं?'

याच सुमारास आपल्या मुलांना घेवून गांधीजींना प्रणाम करण्यासाठी दोन-तीन निराधार बायका आल्या होत्या. बापुजींनी लगेच तो आमरस तीन-चार ग्लासात भरला आणि त्या लहान मुलांना प्यायला दिला. त्यानंतर मात्र त्यांना हायसं वाटलं.

ते मनुबेनला म्हणाले : 'ईश्वर माझ्या मदतीला कसा धावतो, त्याचा हा ताजा दाखला आहे. देवानेच या मुलांना यावेळी माझ्याकडे पाठवलं. आणि ज्या मुलांनी यावं असं वाटत होतं तीच मुलं आली. ईश्वर कसा आहे ते तू बघतेस ना?'

## (५८)

गोलमेज परिषदेत सहभागी होण्यासाठी गांधीजी लंडनला गेले होते त्यावेळी पाचवे राजे जॉर्ज यांनी आलेल्या सगळ्यांसाठी संध्याकाळी भोजन समारंभाचं आयोजन केलं होतं. मात्र त्याकाळचे भारतातील गव्हर्नर सर सॅम्युअल होर यांना गांधीजींना तिथे कसं न्यायचं ? ही चिंता होती. एक तर राजा या बंडखोर नेत्याला भेटेल काय? दुसरं म्हणजे गांधीजींचा पेहराव या समारंभाला साजेसा नव्हता. होर यांनी ही गोष्ट राजाच्या कानावर घातली.

काय? ज्या बंडखोर फकीराने माझ्या निष्ठावान अधिकाऱ्यांना सळो की पळो करून सोडलं, त्याला मी महालात बोलावू ?... अयोग्य कपड्यातील अर्धनग्न काटकुळा माणूस... राजा आपला राग व्यक्त करत होता. पण सरते शेवटी गांधीजींना विनाअत निमंत्रण देण्याचं ठरलं.

समारंभात गांधीजींना राजासमोर नेण्याची जबाबदारी सर सॅम्युअल यांच्याकडेच होती. खादीच्या कपड्यातील गांधीजींना ओळखणं ही तशी काही कठीण बाब नव्हती. पण तिथे राजा आणि गांधीजी यांच्यात भेटीचा सोपस्कार झाला. तो प्रसंग तसा अडचणीचाच होता. गांधीजींच्या बंडखोरीचा विसर पडणं राजाला शक्यच नव्हतं. गेलं वर्षभर साम्राज्याच्या विरोधात गांधीजींनी सत्याग्रहामार्फत प्रचंड लढत दिली होती. पण दोघेही प्रथमच भेटून बोलत होते त्यामुळे तशी इथे काही कटुता नव्हती. राजा तसा सहृदयी माणूस होता. त्यांनी गांधीजींची नीट विचारपूस केळी. बोलत असतानाच राजाची नजर गांधीजींच्या गुढघ्यावर असलेल्या धोतरावर गेली. आता राजा काय बोलतो या कल्पनेने गव्हर्नरचा काळजीने थरकाप उडाला.

पण बोलणं नीट झालं. पंचम जॉर्ज हा स्वत:च्या जबाबदारीचं भान बाळगणारा राजा होता. तो तेव्हा काही बोलला नाही. मात्र निरोप घेताना राजाने गांधीजींना इशारा दिला. तो म्हणाला : 'मिस्टर गांधी, एक लक्षात ठेवा, माझ्या साम्राज्यावर कुणाचं आक्रमण मी सहन करणार नाही.'

त्या प्रसंगाने गव्हर्नरचा श्वास अडकला. आता वाद होतोय की काय? अशी त्याला भीती वाटू लागली.

पण गांधीजींनी सौजन्य दाखवत परिस्थिती सुकर केली. ते राजाला म्हणाले: 'मान्यवर, आपल्या पाहुणचाराचा अनुभव घेतल्यानंतर आपल्यासोबत आता राजकीय विवादात मला पडायचं नाही. ते योग्यही नाही.'

अखेर मित्रत्वाच्या वातावरणात दोघांनी एकमेकाला निरोप दिला.

गव्हर्नर हे सगळं पाहातच राहिला. एक असा प्रामाणिक राजा. आणि दुसरा महान मुत्सद्दी. नेहमीच्या चालीरितींत गोल फिरत राहणाऱ्यांसाठी हा एक चांगला धडा होता.

## (५९)

१९३१ साली गांधीजी गोलमेज परिषदेसाठी लंडनला गेले होते. या भेटीत ब्रिटिश मुत्सद्यांना नमवण्याचे त्यांचे प्रयत्न कामी येत नव्हते. चर्चिल महाशय तर त्यांना भेटायलाही तयार नव्हते. या सगळ्यात जनरल स्मट्स यांच्याकडून मात्र गांधीजींना चांगली वागणूक मिळाली. साम्राज्यातील शहाणा माणूस अशी त्यांची ओळख होती. गांधीजींशी ते भावपूर्वक वागले. जनरल स्मट्स दक्षिण आफ्रिकेतील शासक असताना गांधीजींशी त्यांचा संबंध आला होता. गांधीजी तिथल्या भारतीयांसाठी लढा देत असताना स्मट्स यांनी त्याबाबत सहानुभूती दाखवून भारतीयांना न्याय दिला होता. आधी गांधीजींच्या तीव्र विरोधात असलेले स्मट्स नंतर गांधीभक्त झाले.

लंडनमध्ये त्यांनी गांधीजींना आपल्या घरी बोलावलं. एका कपाटाजवळ गांधीजींना नेत त्यातील एक वस्तू दाखवत ते म्हणाले: 'हे काय आहे? काही आठवतयं ?'

गांधीजी ती वस्तू नीट पाहू लागले. ती चपलेची जोडी होती. दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रह करताना अनेकदा गांधीजींना जेलमध्ये रहावं लागलं होतं. त्यावेळी एकदा स्वत: बनवलेल्या चप्पलेचा हा जोड गांधीजींनी जनरल स्मट्सना भेट दिला होता.

गांधीजी जेलमध्ये होते. ते बॅरिस्टर असतानाही सरकारकडून मिळणारी सगळी वागणूक सहन करत होते. आपला विवेक त्यांनी कधी सोडला नाही. सुरुवातील त्यांना एका छोट्या अंधाऱ्या खोलीत ठेवण्यात आलं होतं. वर असलेल्या एका जाळीतून प्रकाश यायचा तेवढंच. बसायला स्टूलही नव्हतं. उभं राहून ते वाचन करायचे. मजुरीची कामंही ते काहीही तक्रार न करता करायचे. जेलमधून इतर कुठे नेताना त्यांना हातकडी घातली जायची. शौचालयाची अवस्थाही नीट नव्हती. जेवायला नीट मिळत नव्हतं. मात्र हळूहळू गांधीजींना मिळणाऱ्या या वागणुकीत बदल होवू लागला. पण हिंदी कैद्यांचे फार हाल केले जात होते. हे सगळं सहन करतानाच गांधीजींनी आव्हान स्वीकारलं : या छळामार्फत जर जनरल स्मट्स आम्हाला नमवू पाहात असतील तर ते होणार नाही.

१९१४ पर्यंत गांधीजी अनेकदा जेलमध्ये गेले. शेवटच्या वेळेस जेलमध्ये असताना आपल्या हाताने चपलेचा एक जोड त्यांनी बनवला होता. सुटका झाल्यानंतर हा जोडा त्यांनी मिस सोन्या श्लेशिन यांच्यामार्फत आपल्या विरोधी असलेल्या जनरल स्मट्स यांना पोहचवला.

याबाबत जनरल स्पट्स यांनी लिहिलयं की, हा जोडा मी अनेक उन्हाळे पायात घालून फिरलो. ते जोडे पायात घातल्यानंतर प्रत्येक वेळी माझ्या मनात प्रश्न उभा रहायचा की, एवढ्या मोठ्या माणसाने बनविलेल्या चपलेत पाय घालायची माझी खरचं लायकी आहे का?

## (६०)

स्वातंत्र्याच्या लढाईत बिहारमध्ये एका तरुणाचा बळी गेला. बापू त्याच्या आईजवळ गेले. तिच्या पायाला हात लावून ते तिच्या पुढ्यात उभे राहिले. बापू म्हणाले : 'मा, तुमचा हा मुलगाच तुमच्यापुढे उभा आहे. यालाही डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद द्या की देशासाठी तोही प्राणाचं बलिदान करेल...'

समोर उभ्या असलेल्या गांधीजींना पाहून त्या मातेने आशिर्वाद दिला : 'बेटा, अमर रहो.'

बापूंच्या सहृदयतेला मिळालेला तो आशीर्वादाचा प्रतिसाद होता. बापुंनीही मानव कल्याणासाठीच्या यज्ञात आपल्या प्रणाची आहुती दिली.

या सहृदयी महात्म्याच्या बलिदानानंतर मातेची-भारतमातेची प्रार्थना सतत गुंजतेय – 'बेटा अमर रहो !'

* * *